दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक
# राष्ट्र सह्याद्री
• संपादक : काकासाहेब नवले • RNI No. MAHMAR /2019/82605 • वर्ष ६ वे • अंक ११७
• रविवार, ०९ फेब्रुवारी २०२५ • www.rashtrasahyadri.com • पाने ८ • मूल्य रु. ४.००

**दिल्लीकरांकडून काँग्रेसला ठेंगा**



# २७ वर्षांनी दिल्लीत कमळ फुललं !

## आपचं कापलं नाक... झाडू विस्कटला

### दिल्ली विधानसभा निवडणूक निकाल

| दिल्ली | भाजप | आप | काँग्रेस |
|---|---|---|---|
| ७०/७० | ४८ | २२ | ०० |

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** देशभराचे लक्ष लागून असलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने दणदणीत विजय मिळवला. भाजपने ७० पैकी ४८ जागा जिंकल्या आहेत. आम आदमी पक्षाला २२ जागांसह सर्वात मोठा पराभव पत्करावा लागला. आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांचा भाजप उमेदवार परवेश वर्मा यांच्याकडून पराभव झाला. या ऐतिहासिक विजयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजप कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. 'दिल्लीला वेढलेल्या दिखाऊपणा, अराजकता, अहंकार आणि 'आप-दा'चा पराभव झाला आहे, असे मोदी म्हणाले.दिल्ली विधानसभा निवडणुकांसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान पार पडलं. दिल्लीतल्या ७० जागांसाठी आम आदमी पक्ष, भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेस या तीन प्रमुख पक्षांनी कंबर कसली होती. एकीकडे अरविंद केजरीवाल यांची अटक, सुटका आणि त्यानंतरच्या घडामोडींनंतर आम आदमी पक्षानं सत्ता कायम राखण्यासाठी जोरदार प्रयत्न केले असताना दुसरीकडे काँग्रेसकडून प्रचारासाठी दिल्ली पुन्हा काबीज करण्यासाठी दिग्गज नेत्यांना मैदानात उतरवलं होतं. या दोन्ही पक्षांसमोर यंदा कडवं आव्हान होतं ते भारतीय जनता पक्षाचं. त्यामुळे या निवडणुकीकडे सगळ्या देशाचं लक्ष लागलं होतं. त्यात भाजपने दिल्लीवर वर्चस्व सिद्ध केले. निकाल जाहीर झाल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाने दिल्ली सचिवालयाला आदेश जारी केले आहेत. प्रशासनाशी संबंधित कोणत्याही फाईल किंवा कागदपत्र दिल्ली सचिवालयाच्या बाहेर जाऊ नयेत, असे आदेश देण्यात आले आहेत.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचे मुख्य नेते आणि माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचा पराभव झाला आहे. अरविंद केजरीवाल यांचा नवी दिल्ली मतदारसंघातून भाजपचे प्रवेश वर्मा यांनी ४,०८९ मतांनी पराभव केला. त्याचबरोबर आम आदमी पक्षाचे नेते आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांचाही पराभव झाला. दिल्लीच्या विद्यमान (पान ४ वर)

## सत्ता आणि पैशाची मस्ती केजरीवालांच्या डोक्यात गेली : हजारे



अहिल्यानगर : अरविंद केजरीवालांचे विचार, चारित्र्य शुद्ध नाही, म्हणूनच त्यांचा पराभव झाला. त्यांचे जीवन निष्कलंक नव्हते. केजरीवाल यांनी दिल्लीतील मतदारांचा विश्वास गमावला. मी त्यांना वारंवार सांगितलं, मात्र त्यांनी ऐकलं नाही. केजरीवाल यांनी सुरुवातीला चांगली कामे केली. मात्र सत्ता आणि पैशाची मस्ती त्यांच्या डोक्यात गेली, अशी प्रतिक्रिया ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी व्यक्त केली. दिल्ली विधानसभा निवडणुकीत भाजपने आपला जोरदार धक्का दिला आहे. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यासह अनेकजणांचा पराभव झाला. या पार्श्वभूमीवर हजारे माध्यमांशी बोलत होते. दिल्लीत दारूच्या ठेक्यांच्या माध्यमातून जो आर्थिक घोटाळा झाला, त्यामुळे ते बदनाम झाले. एकीकडे केजरीवाल लोकांच्या चारित्र्याबद्दल बोलतात. मात्र दुसरीकडे दारू ठेक्यांमधे घोटाळे करतात, असं लोकांना वाटायला लागलं. दारूचे मोठ्या प्रमाणात परवाने दिले गेले. त्यामुळे सामान्य नागरिकांनी आता त्यांना नाकारल्याचं दिसत आहे. आज जो कौल आपल्याला पाहायला मिळतो आहे तो दारूच्या दुकानांना दिलेली लायसन्स आणि त्यातून मिळालेले पैसे याचा परिणाम असल्याचं हजारे यांनी म्हटलं आहे.



दिल्लीचा चौफेर विकास आणि इथल्या लोकांचं जीवनमान सुधारण्यात आम्ही कोणतीच कसर सोडणार नाही ही आमची गॅरंटी आहे. यासोबतच आम्ही हेही निश्चित करू की विकसित भारताच्या निर्मितीमध्ये दिल्लीची महत्त्वाची भूमिका असेल.

**– नरेंद्र मोदी**



मी दिल्लीतील विजयासाठी भारतीय जनता पक्षाचे आभार मानतो. मला आशा आहे की ते दिल्लीच्या लोकांसाठी काम करतील. सामान्य आप कार्यकर्त्यांची स्वप्नं धुळीला मिळवणाऱ्या व्यक्तीबद्दल मला कोणतीही संवेदना नाही. दिल्लीची आता त्यांच्या तावडीतून सुटका झाली आहे. त्यांनी सामान्य कार्यकर्त्यांच्या स्वप्नांचा वापर स्वतःच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षांसाठी केला. आज दिल्लीत न्याय झाला. जेव्हा आम्ही टीव्हीवर मनीष सिसोदियांच्या पराभवाचं वृत्त पाहिलं, तेव्हा माझ्या पत्नीला अश्रू अनावर झाले. **– कुमार विश्वास**

## दिल्लीच्या सत्तांतराची कारणे

१. अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया, सत्येंदर जैन या नेत्यांवर आर्थिक घोटाळ्याप्रकरणी झालेल्या कारवाईमुळे पक्षाची प्रतिमा डागाळली.
२. दिग्गज नेत्यांना ऑगस्ट व ऑक्टोबरमध्ये तुरुंगातून सोडल्यामुळे त्याचाही त्यांच्या निवडणूक मोहिमेवर परिणाम झाला.
३. दिल्ली महानगर पालिकेतील आम आदमी पक्षाच्या सुमार कामगिरीचा मतांवर परिणाम झाला.
४. इंडिया आघाडी एकसंध ठेवण्यात काँग्रेसला अपयश आले. काँग्रेस आणि आम आदमी पक्षाने वेगवेगळे लढताना एकाच प्रकारच्या मतदारांवर लक्ष केंद्रित केले.

## पक्षनिहाय मतांची टक्केवारी

या निवडणुकीत भाजपला जवळपास ४५.५६ टक्के मतांसह एकूण ७० पैकी ४८ जागा मिळाल्या आहेत. आपला ४३.५७ टक्के मतांसह एकूण २२ जागा मिळाल्या आहेत. तर काँग्रेसला ६.३४ टक्के मते मिळाली आहेत. त्यांना खातेही उघडता आले नाही. आप आणि काँग्रेसला मिळालेल्या एकूण मतांची बेरीज केली, तर हा आकडा ४९.९१ टक्के एवढा होतो. म्हणजेच, भाजपच्या ४५.५६ टक्के या आकड्याच्या तुलनेत ४.३५ टक्क्यांनी अधिक. अर्थात, काँग्रेस आणि आप एकत्र लढले असते आणि मतांची टक्केवारी अशीच राहिली असली, तर चित्र बदललेले दिसू शकले असते.



मी भाजपाला विजयासाठी शुभेच्छा देतो. मला आशा आहे की जनतेच्या विश्वासानुसार भाजपा काम करेल. गेल्या १० वर्षांत आम्ही खूर सारी कामं केली. शिक्षण, आरोग्य, पाणी, वीज अशा अनेक बाबतीत आम्ही कामं केली. दिल्लीतील पायाभूत सुविधाही सुधारण्याचा आम्ही प्रयत्न केला. आता आम्ही सक्षम विरोधी पक्षाची भूमिका पार पाडू. आता आम्ही लोकांच्या सुख-दुःखात सोबत राहू.
**– अरविंद केजरीवाल**



दिल्लीच्या जनतेनं हे दाखवून दिलंय की जनतेला वारंवार खोट्या आश्वासनांनी फसवलं जाऊ शकत नाही. जनतेनं आपल्या मतांनी दूषित यमुना, पिण्याचं प्रदूषित पाणी, खराब रस्ते, सांडपाण्याची अव्यवस्था आणि प्रत्येक गल्लीत उघडलेली दारूची दुकानं याला उत्तर दिलं आहे.
**– अमित शाह**



आम्ही नम्रपणे दिल्लीचा जनादेश मान्य करतो. दिल्लीतील काँग्रेसच्या सर्व कार्यकर्त्यांचे त्यांच्या समर्पणाबद्दल आणि मतदारांचे त्यांच्या पाठिंबाबद्दल आभार मानतो. महागाई, प्रदूषण आणि भ्रष्टाचाराविरुद्ध तसेच दिल्लीच्या प्रगतीसाठीचा लढा अविरतपणे सुरू ठेवू.
**– खा. राहुल गांधी**

## काय म्हणता..!

धर्मेंद्र व्यास




## दिल्लीवरील 'आप'दा टळली : शिंदे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** केजरीवालांचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत. समाजसेवक अण्णा हजारे यांच्यामुळे ते मुख्यमंत्री झाले होते. पण मुख्यमंत्री झाल्यानंतर केजरीवाल अण्णा हजारेंना विसरले. त्यांच्या करणी आणि कथनीत फरक आहे. आता 'आप'दा टळली आहे आणि दिल्लीवरचं संकट दूर झालं आहे. काँग्रेस पक्षाला या निवडणुकीत भोपळा मिळाला. त्यांची भोवळ्याची हॅटट्रिक झाली, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. तसेच भाजपाने दिल्ली जिंकली आता आम्ही मुंबई जिंकू, असा विश्वास त्यांनी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर व्यक्त केला.

दिल्ली विधानसभा निवडणुकीवर प्रतिक्रिया देताना शिंदे म्हणाले, केंद्र सरकारने नुकतेच अर्थसंकल्प सादर केला.घरोघरी लक्ष्मीची पावलं उमटावी म्हणून केंद्राने अनेक योजना आणल्या. या निवडणुकीच्या माध्यमातून देश आर्थिक महासत्ता होईल यावर मतदारांनी विश्वास व्यक्त केला. इंडिया आघाडी जेव्हा जिंकते तेव्हा सगळं चांगलं. इंडिया आघाडीचा पराभव झाला की संस्था भ्रष्टाचारी आहेत, असा आरोप केला जातो. शिव्या देणं चालू होतं. लोकांना काम हवं आहे. कल्याणकारी योजना हव्या आहेत. लोकांना विकास हवा असतो. अशी टीकाही त्यांनी विरोधकांवर केली. जनेतेने काँग्रेस, आपला झिडकारलं आहे. मी दिल्लीला ॲडव्हान्स शुभेच्छा द्यायला गेलो होतो. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीने फेक नेरेटिव्ह पसरवलं. आम्ही मात्र विकासाने लोकांची मनं जिंकली, असं शिंदे म्हणाले.

### मुंबईकरांची तिजोरी साफ करणाऱ्यांना जागा दाखवू

गेल्या अनेक वर्षांत मुंबईकरांच्या तिजोरीची सफाई करण्यात आली आहे. आता मात्र मुंबई बदलत आहे. मुंबई लुटणाऱ्यांना मुंबईकर जागा दाखवतील. आम्ही मुंबईकरांना पुन्हा मुंबईत आणणार आहोत. दिल्लीतील विजयाप्रमाणे विजयाची ही परंपरा कायम सुरु राहील. हे पत्रकार परिषद घेऊन शिव्याशाप देण्यासाठी एकत्र येतात. आम्ही कामासाठी एकत्र येतो.

**– एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री**

## दिल्लीत राष्ट्रवादीच्या पदरी निराशा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** महाराष्ट्रात एनडीएचा घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादीनेही (अजित पवार) दिल्ली विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवली होती. मात्र, यामध्ये त्यांना यश मिळवता आले नाही. त्यांचा एकही उमेदवार विजयापर्यंत पोहचू शकला नाही. यानंतर प्रक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी एक्सवर भारतीय जनता पक्षाचे अभिनंदन केले असून, त्यांच्या पक्षाला या निवडणुकीत यश का मिळाले नाही, याचे विश्लेषण केले जाणार असल्याचे म्हटले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांचे दिल्ली विजयासाठी अभिनंदन करताना आपल्या पोस्टमध्ये म्हणाले की, दिल्ली विधानसभेतील निर्णायक विजयाबद्दल, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी नड्डा यांचे मनापासून अभिनंदन. दिल्लीत स्थापन होणाऱ्या नवीन सरकारला उत्तम कामगिरीसाठी शुभेच्छा. दिल्ली विधानसभा निवडणुकीत 'एनडीए'चा प्रमुख घटकपक्ष असलेल्या भाजपाला मिळालेल्या ४० हून अधिक जागा या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर दिल्लीकरांनी व्यक्त केलेल्या विश्वासाचे प्रतिक आहेत. केंद्र आणि दिल्ली विधानसभेतही पंतप्रधानांच्या विचारांचे डबल इंजिन सरकार आल्याने दिल्लीच्या विकासाला दुप्पट (पान ४ वर)

### झापुक । zupuk

फॅशनच्या कात्रीत
सुसंस्कृत कपडे
कमी झाले
आई बाबाही
पप्पा मम्मी झाले
व्हॅलेंटाईन, फ्रेंडशीप
डे लव्ह करु लागला
म्हातारी संगे
म्हातारा पार्टीत रंगू लागला
विदेशी चकाकीत
देशी अडगळीत पडली
तरणी पोरं पोरी
आईबापाच्या हातातुन
सटकली

**नवनाथ कुताळ,**
**9422231825**

## सहावीतील विद्यार्थिनीवर अतिप्रसंग!
## अत्याचारी मुख्याध्यापकासह मदत करणारा शिक्षक निलंबित

**नाशिक :** भारत सर्व सेवा संघ, पाचेगांव ता. नेवासा जि. अहिल्यानगर संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे इयत्ता सहावीत शिकणाऱ्या १२ वर्षीय विद्यार्थीनीसोबत मुख्यध्यापकाने वर्गशिक्षकाच्या मदतीने अतिप्रसंग केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली. यानंतर तातडीने मुख्याध्यापक तुकाराम साबळे, वर्गशिक्षक गोरख जोशी या दोघांना तातडीने निलंबित करण्याचे आदेश शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिले. त्यानुसार संस्थेने कारवाई केली.

या प्रकरणातील दोषी शिक्षक व मुख्यध्यापकावर भारतीय न्याय संहिता आणि बाल संरक्षण व अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार घोटी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यानंतर तातडीने मुख्याध्यापक तुकाराम साबळे, वर्गशिक्षक गोरख जोशी या संशयित आरोपींना अटक करून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. दरम्यान, आज इगतपुरी तालुक्यात असलेल्या शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी या घटनेची गंभीरपणे दखल घेत दोन्ही आरोपींना सेवेतून बडतर्फ करण्याचे निर्देश शिक्षण विभागाला दिले. यानुसार कार्यवाही करत शिक्षक व मुख्याध्यापक यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच या गुन्ह्याचा गंभीरपणे तपास करत आरोपींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देशही पोलीस अधीक्षक नाशिक यांना मंत्री भुसे यांनी दिले आहेत.






# संपादकीय

## प्रश्नचिन्ह... निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर अन् विरोधकांच्या जागरुकतेवरही..!

निवडणूक आयोग हे भारतीय लोकशाहीतील एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे, पण या स्वायत्त संस्थेवर होत असलेल्या आरोपांमुळे तिची विश्वासार्हता झाकोळली गेली आहे. दोन महिन्यांपूर्वी पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतदारयाद्यांत झालेल्या बेरजा आणि वजाबाक्यांचा मुद्दा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि त्यांच्या डेटा अभ्यासक सहकाऱ्यांनी ऐरणीवर आणला. यानिमित्ताने निवडणूक आयोगाचा गोपनीयता व पारदर्शतेच्या लपवाछपवीचा खेळही चर्चेत आला आहे. केंद्रात मोदी सरकार आल्यापासून मुख्य निवडणूक आयुक्ताचे पद भूषवलेल्यांत राजीवकुमार यांची कारकीर्द प्रदीर्घ ठरली आणि सर्वाधिक वादग्रस्तही. २०२४च्या लोकसभा निवडणुकीव्यतिरिक्त २०२० ते २०२५ दरम्यान देशातील २८ राज्ये आणि आज, शनिवारी मतमोजणी होत असलेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीसह तीन केंद्रशासित प्रदेशांच्या विधानसभा निवडणुकांचे आवर्तन राजीवकुमार यांच्या कारकीर्दीत पूर्ण झाले. ''आपल्या कारकीर्दीत १४ विविध राजकीय पक्षांची या ३० राज्यांमध्ये सत्ता आली. म्हणजे सर्वच निवडणुका निःपक्ष झाल्या'', असा दावा राजीवकुमार करतात. पण त्यांच्या कारकीर्दीत झालेल्या ३२ निवडणुकांदरम्यान त्यांच्यावर झालेले आरोप पाहिले तर ते किती गंभीर स्वरूपाचे आहेत, हे कळते. सत्ताधारी पक्षाला झुकते माप देणे, त्या दृष्टीनेच निवडणुकांच्या वेळापत्रकांची घोषणा करणे असे अनेक प्रकार घडले. आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाईत विलंब लावणे, विरोधी नेत्यांवर निवडणुकीदरम्यान ईडी-सीबीआयच्या कारवाया होऊ देणे, मतदारयाद्यांतून मतदारांची नावे गायब होणे, नव्या नावांची भर घालणे, एकाच कुटुंबातील मतदारांची मते वेगवेगळ्या मतदान केंद्रांमध्ये टाकणे, विरोधी पक्षांच्या समर्थकमतदारांची मतदान केंद्रे दोन किमीपेक्षा लांब ठेवणे, तेथील मतदानाची प्रक्रिया संथ करणे, मध्यमवर्गासाठी त्यांच्याच सोसायटीमध्ये मतदानाची सोय करणे, मतदान आकड्यांमध्ये जाहीर करण्याऐवजी टक्क्यांमध्ये जाहीर करणे, मतदानाची टक्केवारी मतमोजणीच्या दिवसापर्यंत वाढवणे इत्यादी. राजीवकुमार मुख्य निवडणूक आयुक्त होण्यापूर्वी मतदान आटोपले की, त्याच सायंकाळी पत्रकार परिषद बोलावून हंगामी आकडेवारी जाहीर केली जायची. दुसऱ्या दिवशी मतदारसंघनिहाय मतदानाचे अंतिम आकडे जाहीर केले जायचे. पण राजीवकुमार यांनी ही परंपरा संपुष्टात आणली. लोकसभा निवडणुकीत मतदानाच्या पहिल्या टप्प्यापासून सातव्या टप्प्यापर्यंत मतदानाची अंतिम आकडेवारी जाहीर करण्याच्या बाबतीतील विलंबाचा विक्रमही त्यांनी नोंदवला. विरोधी पक्षांनी उपस्थित केलेल्या वादग्रस्त मुद्यांची दखल न घेता शायरीच्या माध्यमातून आरोपांना थातुरमातूर उत्तरे देऊन त्यांनी वेळ मारुन नेली. यापूर्वी कोणत्याही मुख्य निवडणूक आयुक्तावर वारंवार स्पष्टीकरण देण्याची वेळ आली नव्हती. महाराष्ट्रात शिवसेनेत उभी फूट पडून महाविकास आघाडीचे सरकार गडगडले. वर्षभरानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही फूट पडली. यावेळी राजीवकुमारच मुख्य आयुक्त होते. खरी शिवसेना आणि खरी राष्ट्रवादी कोणती या वादावर निवडणूक आयोग आपल्या बाजूने निकाल देईल, याचा उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या पक्षांना भरवसाच उरलेला नव्हता आणि तसेच घडले. एकूणच निवडणूक आयोगाची पत घसरली आहे. ईव्हीएममध्ये घोळ करुन निवडणुका जिंकल्या जात असल्याचा विरोधकांचा आरोप मागे पडावा, असे मतदारयाद्यांमध्ये बेरजा-वजाबाक्यांच्या घोळाचे नवेच पर्व राजीवकुमार यांच्या कार्यकाळात सुरू झाले. मध्य प्रदेश, छत्तीसगढ, हरियाना, महाराष्ट्र या राज्यांमधील विधानसभा निवडणुकांच्या चार-पाच महिने आधी मतदारांची संख्या वाढविण्याच्या प्रकाराचा काँग्रेससारख्या सदैव बेसावध राहणाऱ्या पक्षाला चांगलाच फटका बसला. खरे तर काँग्रेसने त्याचवेळी राष्ट्रीय पातळीवर हा मुद्दा उपस्थित करायला हवा होता. लोकसभेनंतर विधानसभा निवडणुकांत मतदारांची संख्या ३९ लाखांनी वाढली. या वाढलेल्या मतदानाचा सर्वाधिक लाभ भाजपला झाला, अशी ओरड राहुल गांधी करीत आहेत. पण मतदारयाद्या अद्ययावत होत होत्या, तेव्हा राहुल गांधी आणि राज्यातील त्यांचे सहकारी झोपी गेले होते काय, असा प्रश्न पडतो. राष्ट्रीय राजकारणात दाखल होऊन राहुल गांधी यांना २१ वर्षे होतील. आता ते लोकसभेतील विरोधी पक्षनेते झाले आहेत.पण एखादा मुद्दा नीट गृहपाठ करुन मांडण्याची तसेच जबाबदारीने मांडण्याची ते अजूनही ते तसदी घेताना दिसत नाहीत. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीनंतर आणि विधानसभा निवडणुकीपूर्वी मतदारांची संख्या ७० लाखांनी वाढल्याचा आरोप त्यांनी गेल्या आठवड्यात लोकसभेत केला. पण संजय राऊत आणि सुप्रिया सुळे यांच्यासोबत संयुक्त पत्रकार परिषदेत हा आकडा खाली आला. राज्यात ३९ लाख मते वाढल्याचा सुधारित दावा त्यांनी केला. अशा सातत्य नसलेल्या दाव्यांमुळे आरोपातील गांभीर्य कमी होते. मतदान संपल्यानंतर अनेक केंद्रांवर विरोधी पक्षांचे, विशेषतः काँग्रेसच्या उमेदवारांचे बूथ प्रतिनिधीच नसतात, या तक्रारी नव्या नाहीत. त्यामुळे प्रतिस्पर्धी पक्षांना आयती संधी मिळण्याची शक्यता असते. त्यामुळे आयोगावर प्रश्नचिन्ह लावण्यापूर्वी आपली पक्षसंघटना किती जागरुक आहे, याविषयी काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांनी अंतर्मुख होण्याची गरज आहे.

# जादा दराने खत विक्री करणाऱ्या तीन कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** कृषी निविष्ठा विक्री केंद्रांमध्ये खतांची लिंकिंग (संलग्न विक्री), जादा दराने खते विक्री, विक्री व्यवहार नोंदीतील त्रुटी आदी गैरप्रकार निदर्शनास आल्याने तालुक्यांतील तीन कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. वळण येथील रणजित आढाव व केंदळ येथील पांडुरंग कृषी सेवा केंद्र तर मानोरीतील माऊली कृषी सेवा केंद्राचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये शेतकऱ्यांना दर्जेदार कृषी निविष्ठा योग्य दरात मिळाव्यात, यासाठी जिल्ह्यात तालुकास्तरीय गुणनियंत्रण निरीक्षक व भरारी पथकाच्या माध्यमातून विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. या तपासणीदरम्यान विविध कृषी निविष्ठा विक्री केंद्रांवर नियमभंग आढळल्यामुळे जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ यांनी याप्रकरणी कठोर कारवाईचे आदेश दिले. पूर्ण तपासणी करून विविध निविष्ठांचे नमुने काढणे, खत विक्री व्यवहार नोंदी, ज्यादा दराने खते विक्री, खतांची लिंकिंग असे प्रकार आढळल्यास संबंधितांवर कृषी निविष्ठा विक्री कायदे व नियमानुसार कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत.

या तपासणी दरम्यान राहुरी तालुक्यातील तीन कृषी सेवा केंद्रांमध्ये खतांची लिंकिंग (संलग्न विक्री), जादा दराने खते विक्री, विक्री व्यवहार नोंदीतील त्रुटी आदी प्रकार निदर्शनास आले. त्यानुसार राहुरी तालुक्यातील तीन कृषि सेवा केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले आहे. संबंधीत कृषी सेवा केंद्रचालकांना म्हणणे मांडण्यासाठी मुदत दिली आहे.

# आयटीआयमध्ये क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अशोकनगर :** अशोक उद्योग उद्योग समूहाचे सूत्रधार भानुदास मुरकुटे यांच्या मार्गदर्शनाखालील अशोकनगर येथील भास्करराव गलांडे पाटील आयटीआय महाविद्यालयाच्या वार्षिक क्रीडा स्पर्धेचे उदघाटन कारखान्याचे संचालक निरज मुरकुटे यांच्या हस्ते झाले.

तरुण पिढीला विविध खेळांसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे त्यांच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकासासाठी अत्यावश्यक आहे. खेळामुळे संघभावना, नेतृत्वगुण आणि परिश्रम करण्याची प्रेरणा मिळते. अशा स्पर्धेमुळे युवा पिढीचा आत्मविश्वास वाढतो आणि ते भविष्यात देशाचे नाव मोठे करण्यासाठी सज्ज होतात, असे मत निरज मुरकुटे यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रसंगी अशोक पॉलिटेक्निकचे प्राचार्य अंजाबापू शिंदे, आयटीआयचे प्राचार्य रईस शेख, कार्यालयीन अधीक्षक दत्तात्रय झुराळे, भारत भालेराव, अनंत खंडागळे, किशोर उदरभरे, गिरीश जाधव, सुदाम शिरोळे, मयूर खाडे, दिलीप पठारे, हरिभाऊ वने आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

# गोंडेगाव शाळेच्या स्वागत कमानीचे उद्घाटन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**गोंडेगाव :** येथील पीएम श्री जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेत मिशन आपुलकी उपक्रमांतर्गत स्व. पुंडलिक भाऊराव कदम यांच्या स्मरणार्थ मध्ये संजय कदम, अनिल कदम, रवींद्र कदम व विकास कदम यांनी दोन लाख दहा हजार रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या स्वागत कमानीचे उदघाटन गोदाधाम सराला बेटाचे मठाधिपती गुरुवर्य रामगिरि महाराज यांचे हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी अरविंद फोपसे होते. महाराजांच्या हस्ते फीत कापून स्वागत कमानीचे अनावरण करण्यात आले. कमानीसाठी देणाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. सराला बेटाचे विश्वस्त मधु महाराज कडलग यांचा सन्मान अनिल कदम यांच्या हस्ते करण्यात आला. शाळेच्यावतीने मुख्याध्यापक संपत हिरगळ व गणेश महाडिक यांनी रामगिरि महाराजांचा सन्मान केला. कार्यक्रमानंतर कदम परिवाराने विद्यार्थी आणि उपस्थित ग्रामस्थांना मिष्टान्न भोजन दिले. प्रास्ताविक गणेश महाडिक यांनी केले तर आभार राजेंद्र पंडित यांनी मानले. यावेळी अविनाश दिवटे, गोरख कुऱ्हाडे, विलास कदम, सुनील वाणी, राजेंद्र कदम, शंतनु फोपसे, सुनील कदम, कुंडलिक दिवटे, भारत बढे, सतीश बडदे, प्रमोद मलिक, गणपत फोपसे, दिलीप कदम, अमोल तांबे, ज्ञानेश्वर गुलदगड, रतन तुपे, भगवान कदम, गोविंद कदम, वाल्मीक तांबे, सोमनाथ कडलग, संदीप पोखरे, अशोक चौधरी, रमेश थोरात, दौलत आमले, योगेश पोखरे यांच्यासह नागरीक उपस्थित होते.

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत वळण शाळेचे विद्यार्थी चमकले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** तालुका जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या क्रीडा स्पर्धेमध्ये वळण जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे विद्यार्थी चमकले आहेत. अनेक विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेमध्य निवड करण्यात आली.

कबड्डी स्पर्धेत लहान गटात वळण शाळेने प्रथम क्रमांक पटकावला. गोळाफेक मोठा गटात ज्ञानेश्वरी खिलारी हिने प्रथम तर थाळीफेकमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. थाळीफेक मोठ्या गटात ओम साईनाथ आगलावे याने तृतीय क्रमांक मिळविला. उंचउडी मोठा गटात संकेत मोरे व प्रणाली भोगे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला असल्याने या विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत निवड झाली आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे सरपंच सुरेश मकासरे, अशोक कुलट, एकनाथ खुळे, ज्ञानेश्वर खुळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पत्रकार गोविंद फुणगे, उपाध्यक्ष आशाबाई खुळे, स्थानिक गुन्हे शाखेचे मनोज गोसावी, उमेश खिलारी, सुनील खुळे, कैलास बनकर, बापूसाहेब चव्हाण, धनंजय आढाव, डॉ. किशोर म्हस्के, रामदास कार्ले, योगेश काळे, वसंत आढाव, सोमनाथ कार्ले, विठ्ठल कार्ले, भाऊराव गोसावी आदिंसह शाळा व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्य तसेच पालकांनी अभिनंदन केले आहे. मुख्याध्यापिका मंजुशा जाधव, मच्छिंद्र कदम, पोपट फापाळे, कल्पना सुपेकर, वैशाली गायकवाड, मनिषा कुंभारकर, हमीद शेख, वैशाली दरेकर, दीपक येळे यांचे विद्यार्थांना मार्गदर्शन लाभले.

# बालनाट्यभूमी चांगला माणूस घडवण्याचे साधन : डॉ. जोशी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**श्रीरामपूर :** बालनाट्य, किशोर नाट्य आणि कुमार नाट्य यातूनच पुढची पिढी घडत असते. बालनाट्य हे टॉनिक आहे. तुम्ही करीअर कुठलंही निवडा बोलावं लागतंच. नाटकातून उत्तम बोलण्याचे संस्कार मिळतात. मानसिक व बौद्धिक विकास होतो आणि महत्त्वाचे म्हणजे चांगला माणूस घडवण्याचे काम नाट्यभूमी करते, असे प्रतिपादन किलबिल बाल विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व रंगकर्मी डॉ विजयकुमार जोशी यांनी केले.

येथील हिंद सेवा मंडळाच्या भि. रा. खटोड कन्या विद्यालयात किलबिल बालविकास संस्थेच्या सहकार्याने आयोजित बाल नाट्य कार्यशाळेत ते बोलत होते यावेळी शाळेचे अध्यक्ष दत्तात्रय साबळे, वैशाली गिरमे, प्राचार्या नंदा कानीटकर, उपमुख्याध्यापक रश्मी कासार, पर्यवेक्षक मंगला डोळस, किलबिलच्या सदस्या व निवेदक सौ गौरी जोशी, सचिव रविराज रसाळ उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य नंदा कानीटकर यांनी केले. परिचय व सत्कार प्रा आदिनाथ जोशी यांनी केला. वैशाली गिरमे यांनी उपक्रमाचे कौतुक केले. साबळे म्हणाले की, श्रीरामपुरातील सांस्कृतिक वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी ही कार्यशाळा उपयुक्त आहे. भविष्यात मंडळाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आयोजन करण्यात येईल. कार्यशाळेत बोलण्याचे कौशल्ये, आवाजातील चढ उतार तसेच नवरस संदर्भात साभिनय माहिती देण्यात आली. विद्यार्थीनींनी उदंड प्रतिसाद दिला. यावेळी. सायली कुरापटी, समिक्षा शिंदे, सायमा सय्यद, प्रणिती सहाणे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यशाळेस उषा गाडेकर, अजय पुंड यांचे सहकार्य लाभले. अवधूत कुलकर्णी यांनी आभार मानले.

## प्रत्येक शाळेत सखी सावित्री समिती स्थापन करा

# रमाई संस्थेचे प्रशासनाला निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** मुलींच्या सुरक्षितेच्या दृष्टीने तालुक्यातील प्रत्येक शाळेत सखी सावित्री समिती स्थापन करणे अनिवार्य तसेच सक्तीचे करण्यासाठी आज रमाई बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने तहसीलदार व पोलिस प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

तहसीलदार नामदेव पाटील तसेच पोलिस प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने शिक्षण विभागाकडून काही नियम करण्यात आले आहेत. त्यास अनुसरून शाळांमध्ये सखी सावित्री समिती स्थापन करण्यात यावी, अशी घोषणा मार्च २०२२ मध्ये करण्यात आली. राज्यातील सर्व शाळांमध्ये मुला-मुलींच्या सुरक्षितेच्या व निकोप आणि समतामूलक वातावरण निर्मितीसाठी शासनस्तरावरून सखी सावीत्री समितीचे गठन करण्यात येत आहे. त्यास अनुसरून राहुरी तालुक्यातील प्रत्येक शाळेमध्ये मुला-मुलींच्या सुरक्षितेसाठी सखी सावित्री समिती स्थापन करणे अनिवार्य करावे.

निवेदन देते वेळी रमाई बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्रराज्य च्या संस्थापक अध्यक्षा स्नेहल सांगळे, महिला संघर्ष समिती अध्यक्षा वर्षा बाचकर, सामाजिक कार्यकर्त्या सीमा तुपे, वनिता जाधव, मनीषा बोबडे आदी महिला उपस्थित होत्या.

# देडगाव शाळेत चित्रकला कार्यशाळा उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**बालाजी देडगाव :** येथील देडगाव नवे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दप्तरमुक्त शाळा अंतर्गत चित्रकला कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी योगिता तांबे, सुमन दळवी, बबिता दळवी, सुरेखा दळवी, खुशी तांबे उपस्थित होत्या.

शिक्षक अभिषेक घटमाळ यांनी बाल कलाकारांना कलाविषयक मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आला. कार्यशाळेला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आप्पासाहेब दळवी, दानियल दळवी, पोपट मुंगसे, बन्सीभाऊ मुंगसे, आनंद दळवी, उत्तम सकट, प्रकाश दळवी, प्रदिप मिरपगार, संदिप मिरपगार, प्रविण दळवी, अविनाश दळवी, अविनाश तांबे, नामदेव तांबे, संभाजी तांबे, येशूदास दळवी, ईश्वर भवार, गहिनीनाथ भवार, मयुर कोल्हे, सनी आढाव यांचे व पालकांचे सहकार्य लाभले. शाळेच्या विविध उपक्रमांना गटशिक्षणाधिकारी शिवाजीराव कराड ,विस्ताराधिकारी शेख ,केंद्रप्रमुख कमल लाटे यांचे मार्गदर्शन लाभत असते. कार्यशाळेचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक अभिषेक घटमाळ व आभार सहशिक्षिका मनिषा कांबळे यांनी मानले.

# खेलो इंडिया स्पर्धेत महिला खेळाडूंची दैदिप्यमान कामगिरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** नागपूर येथे झालेल्या खेलो इंडिया उमेन्स लीग राष्ट्रीय आष्टे डू मर्दानी आखाडा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे नेतृत्व करीत नेवासा येथील महिला खेळाडूंनी ४ सुवर्ण, १ रजत व २ कांस्यपदक मिळविले.स्पर्धेत महाराष्ट्र, दिल्ली, राजस्थान, ओडीसा, आसाम,केरळ, कर्नाटक, तामिळनाडू या राज्यातून २२५ महिला स्पर्धक सहभागी झाल्या होत्या. स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व करीत नेवासा येथील आष्टे डू मर्दानी आखाड्याच्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले शिवकला प्रकारात सृष्टी वाल्हेकर सुवर्णपदक, निशा जाधव रजतपदक, तेजल सुरोशे, श्रेया चव्हाण यांना कांस्यपदक तर दांडपट्टा प्रकारात प्रियांका राहिंज, आरुषी नरोडे, उत्कर्षा आलवणे यांनी सुवर्णपदक मिळविले या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक सुरेश लव्हाटे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूंचे अहिल्यानागर आष्टे डू मर्दानी आखाडा असोसिएशनचे अध्यक्ष संजय सुखदान यांनी अभिनंदन केले.

# ओला इलेक्ट्रिकने प्रीमियम सेगमेंटमध्ये ८ नवीन स्कूटर्स केल्या लाँच

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक :** भारतातील सर्वात मोठी प्युअर-प्ले ईव्ही कंपनी ओला इलेक्ट्रिकने त्यांचा रस वन जेन ३ पोर्टफोलिओ लाँच केला आहे. जेन ३ प्लॅटफॉर्मवर बनवलेल्या या प्रगत स्कूटर्सनी इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञानाला पुढील स्तरावर नेले आहे.हा पोर्टफोलिओ एसवन एक्स+ २ केडब्ल्यूएच साठी ७९,९९९ रुपयांपासून सुरू होतो, जो एसवन प्रो+ ५.३ केडब्ल्यूएच साठी १,६९,९९९ रुपयांपर्यंत (प्रारंभिक किंमत) जातो.जेन ३ पोर्टफोलिओमधील सर्वाधिक चर्चेत असलेल्या फ्लॅगशिप स्कूटर्स, एसवन प्रो+ ५.३ केडब्ल्यूएच (४६८० भारत सेल) आणि ४ केडब्ल्यूएच यांची किंमत अनुक्रमे १,६९,९९९ रुपये आणि १,५४,९९९ रुपये आहे. एसवन प्रो ४ केडब्ल्यूएच आणि ३ केडब्ल्यूएच ची किंमत अनुक्रमे १,३४,९९९ रुपये आणि १,१४,९९९ रुपये आहे. एसवन एक्स श्रेणीतील २ केडब्ल्यूएच, ३ केडब्ल्यूएच आणि २ केडब्ल्यूएच प्रकारांची किंमत अनुक्रमे ७९,९९९ रुपये, ८९,९९९ रुपये आणि ९९,९९९ रुपये आहे. एसवन एक्स+ ४ केडब्ल्यूएच ची किंमत १,०७,९९९ रुपये आहे. याशिवाय, कंपनीच्या जेन २ स्कूटर्सवर ३५,००० रुपयांपर्यंतची सूट मिळत



राहील, ज्यामध्ये एसवन प्रो, एसवन एक्स (२ केडब्ल्यूएच,३ केडब्ल्यूएच आणि ४ केडब्ल्यूएच) यांचा समावेश आहे ज्यांची किंमत १,१४,९९९ रुपये; ६९,९९९ रुपये; ७९,९९९ रुपये आणि अनुक्रमे ८९,९९९ रुपये.जेन ३ प्लॅटफॉर्ममुळे स्कूटर्सची कार्यक्षमता, कार्यक्षमता, सुरक्षितता आणि विश्वासार्हता लक्षणीयरीत्या वाढली आहे. संपूर्ण पोर्टफोलिओ आता ऑप्टिमाइझ्ड परफॉर्मन्स आणि विश्वासार्हतेसाठी मिड-ड्राइव्ह मोटर आणि चेन ड्राइव्हसह येतो, आणि सुधारित रेंज आणि कार्यक्षमता प्रदान करणारे एकात्मिक एमसीयू (मोटर कंट्रोल युनिट) देखील आहे. म्हणूनच, जेन ३ पोर्टफोलिओ जेन २ च्या तुलनेत २० टक्के जास्त पीक पॉवर, ११ टक्के कमी खर्च आणि २० टक्के जास्त रेंज देते. जेन ३ स्कूटर्समध्ये श्रेणी-प्रथम ड्युअल एबीएस (अँटी-लॉक ब्रेकिंग सिस्टम) आणि पेटंट केलेले ब्रेक-बाय-वायर तंत्रज्ञान आहे. हे ब्रेक पोझिशन सेन्सरवर आधारित ब्रेकिंग लागू करते आणि रीजनरेटिव्ह आणि मेकॅनिकल ब्रेकिंगमध्ये डायनॅमिक मॉड्युलेशन प्रदान करते. हे पेटंट केलेले तंत्रज्ञान ऊर्जा पुनर्प्राप्ती १५ टक्क्याने वाढवते आणि सर्व प्रकारच्या रायडिंग परिस्थितीत अतुलनीय सुरक्षा, नियंत्रण आणि कार्यक्षम ब्रेकिंग प्रदान करते. ओला इलेक्ट्रिकचे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर, भाविश अग्रवाल म्हणाले, आमच्या पहिल्या पिढीतील स्कूटर ग्राहकांसाठी महत्त्वाकांक्षी इलेक्ट्रिक स्कूटर होत्या, ज्यांनी देशात इलेक्ट्रिक स्कूटर चळवळ सुरू केली. दुसऱ्या पिढीतील स्कूटर्स अधिक स्मार्ट होते, त्यांचा विस्तारित पोर्टफोलिओ होता जो प्रत्येक भारतीयासाठी वेगवेगळ्या किंमत श्रेणींमध्ये स्कूटर देत असे. आता जेन ३ पोर्टफोलिओ इलेक्ट्रिक स्कूटर उद्योगाला मपुढील स्तरावरफ घेऊन जात आहे. जेन ३ स्कूटर्सची अतुलनीय कामगिरी आणि सुधारित कार्यक्षमता नवीन बेंचमार्क स्थापित करेल आणि उद्योगात पुन्हा एकदा परिवर्तन घडवून आणेल.

# महांकाळवडगाव शाळेत बाल-आनंद मेळावा उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर :** महांकाळवडगावच्या जिल्हा परिषद शाळेत बाल-आनंद मेळावा उत्साहात झाला. उद्योजक नामदेव पवार आणि उपसरपंच सुधाकर खुरुद यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी रंगवलेल्या सुंदर चित्रांचे आणि विद्यार्थिनींनी काढलेल्या रांगोळीचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. तसेच विद्यार्थ्यांनी घरच्या शेतातील ताजा भाजीपाला, फळे, घरी बनवलेले स्वादिष्ट खाद्यपदार्थ इत्यादींचे विक्रीसाठी स्टॉल लावले होते. विद्यार्थ्यांच्या पालकांनी सक्रीय सहभाग घेऊन विद्यार्थ्यांना मदत केली. पालक आणि ग्रामस्थ यांनी विद्यार्थ्यांनी विक्रीसाठी आणलेला भाजीपाला, फळे, खाद्यपदार्थ खरेदी करून आस्वाद घेतला आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. बाल- आनंद मेळाव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना खरेदी-विक्री, नफा-तोटा, व्यवहार-व्यापार या संकल्पना कळल्या. मेळाव्यात जवळपास दहा हजार रुपयांची उलाढाल झाली. यावेळी कामगार तलाठी सरगैया मॅडम, भीमबाई खुरूद, ग्रामपंचायत सदस्य नानासाहेब वानखेडे, दत्तात्रय चोरमल, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सविता दातीर, सुलताना बेग, दत्तात्रय खुरुद, सविता पवार, जयश्री त्रिभुवन, कावेरी चोरमल, शिक्षक हुसेन शेख, बेबी त्रिभुवन, प्रवीण कांबळे, एकनाथ आव्हाड, आदेश जवने, नारायण पवार, असिफ बेग, जमादार शेख, सोपान पवार, रवींद्र त्रिभुवन, योगिता पवार आदी उपस्थित होते. सरपंच सुवर्णा चोरमल, गटशिक्षणाधिकारी साईलता सामलेटी , विस्ताराधिकरी मंगल गायकवाड, केंद्रप्रमुख संजीवनी अंबिलवादे ,पोलीस पाटील रंगनाथ चोरमल, निलेश चोरमल, केंद्र समन्वयक राजेंद्र केदारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपूर, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)- ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि. अहमदनगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय- कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहमदनगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले. संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer Kakasaheb Bahasaheb Nawale To be Printed At Saived Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahmednagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor, Near New Court, Shrirampur, Dist. Ahmednagar, Maharashtra 413 709, India Editor : Karan Babasaheb Nawale" RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com, Email ID- rashtrasahyadri @ gmail.com. Mo. 7774001818

## सहकार दिंडीचे आ.आशुतोष काळेंनी केले स्वागत



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : शिर्डी येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेच्या पार्श्वभूमीवर नागपूर ते कोपरगाव मार्गावरून येणाऱ्या कै .वैकुंठभाई मेहता सहकार दिंडीचे कोपरगाव शहरामध्ये मोठ्या उत्साहात आगमन झाले. यावेळी कोपरगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ दिंडी आली असता आ.आशुतोष काळे यांनी सहकार दिंडीचे स्वागत करून स्वत: दिंडीत सहभागी झाले. यावेळी त्यांनी छत्रपती शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले.

यावेळी आ. काळे म्हणाले की, सहकाराने समाजाचा विकास साधणे हा एक दीर्घकालिक आणि शाश्वत उपाय आहे. सहकाराची मूलभूत तत्त्वे म्हणजेच समता, सहकार्य, आणि परस्परावलंबन. हे तत्त्व सर्वांगीण समाजाचा विकास साधण्यास मदत करतात, विशेषतः गरीब, दुर्गम आणि ग्रामीण भागातील नागरीकांसाठी सहकारी संस्थांच्या माध्यमातून समाजाच्या विविध स्तरांवर विकास साधता येवू शकतो व सर्व स्तरावर सुख-समृद्धी येवू शकते हे सहकाराच्या माध्यमातून सिद्ध झाले असल्याचे आ. काळे म्हणाले.

महाराष्ट्र शासन सहकार विभाग असोसिएशन ऑफ एशियन कॉन्फडरेशन ऑफ क्रेडिट युनियन्स, फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट को-ऑप.क्रेडिट सोसायटी लिमिटेड व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन यांच्या वतीने उद्या (रविवार) आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. शिर्डीत होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेच्या माध्यमातून सहकार चळवळीचा प्रचार व प्रसार व्हावा हा मुख्य उद्देश या सहकार दिंडीचा असून दिंडी सोबत देश विदेशातून आलेले सहकार प्रतिनिधी,महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी,माजी नगरसेवक व कार्यकर्ते उपस्थित होते.

## टाकळीभान येथे माता रमाई आंबेडकर यांची जयंती



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : टाकळीभान बसस्तानक परिसर येथे माता रमाई आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व विधिवत पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भाऊसाहेब पवार, ॲड. रत्नाकर रणनवरे, संविधान गृपचे मेजर विनोद रणनवरे, सुंदर रणनवरे, अप्पासाहेब रणनवरे, सतीश रणनवरे, शिवा साठे, आहेर, किशोर रणपिसे, राजेंद्र रणनवरे, रवी रणनवरे, सागर रणनवरे आदींसह संविधान गृपचे सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

## द•ख•ल

### तहसील कार्यालयात उद्या आ. काळेंचा जनता दरबार

**कोळपेवाडी** : नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी उद्या (सोमवारी) तहसील कार्यालय, कोपरगाव येथे सकाळी १० वाजता आ .आशुतोष काळे जनता दरबार घेणार असल्याची माहिती काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून देण्यात आली आहे. कोपरगाव विधानसभा मतदार संघातील नागरिकांना शासकीय कार्यालयात येणाऱ्या अडचणी तातडीने मार्गी लागाव्या यासाठी आ. काळे यांनी जनता दरबार व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. त्यातून नागरिकांचे विविध प्रश्न, तक्रारी, अडी-अडचणी यांचे निवारण होत आहे. जनता दरबारात प्रामुख्याने महसूल विभाग, भूमी अभिलेख, वन विभाग व शेती महामंडळ आदी विभागातील तक्रारींचे निवारण करण्यात येणार आहे. नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आ. काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

### निमगाव खुर्दच्या सरपंचपदी धनराज गोपाळे

**निमगाव पागा** : निमगाव खुर्दच्या सरपंचपदी धनराज गोपाळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सभासदांच्या उपस्थितीत निवडणूक प्रक्रिया पार पडली. माजी सरपंच संदीप गोपाळे यांनी राजीनामा दिल्यामुळे सरपंच पदाची जागा रिक्त झाली होती. रिक्त पदसाठी धनराज गोपाळे यांचा एकमेव अर्ज असल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. याप्रसंगी ग्रामपंचायत सदस्य संदीप गोपाळे, बाळासाहेब गोपाळे, उपसरपंच राहुल चंद्रमोरे, ज्योत्स्ना गोपाळे, कावेरी भागवत, रूपाली कासार, पल्लवी गोपाळे, अस्मिता कासार या सदस्यांसह कामगार पोलीस पाटील गोरक्षनाथ गोपाळे, मनीष गोपाळे, भास्कर गोपाळे, सतीश कासार, प्रवीण गोपाळे, विनायक गोपाळे, पी. के. गोपाळे, भास्कर गोपाळे, विलास गोपाळे, संपत गोपाळे उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून धांदरफळच्या मंडल अधिकारी ज्योती ससे, मदतनीस सहाय्यक ग्रामविकास अधिकारी प्रशांत हासे, ग्राम विकास अधिकारी संजय हासे यांनी काम पाहिले. आभार बाळासाहेब गोपाळे यांनी मानले.

### 'जिओ'च्या वाढत्या रिचार्जमुळे ग्राहक हैराण

**श्रीरामपूर** : तालुल्यातील मुठेवाडगाव येथे जिओ मोबाइल कंपनीचे असंख्य ग्राहक आहेत. जिओने रिचार्जमध्ये जास्त वाढ केली आहे. ती सर्व सामान्यांना परवडणारी नाही. सहा महिन्यांपासून नेटवर्क मिळत नाही. त्यामुळे जेष्ठ नागरिक, विद्यार्थी सर्वच ग्राहक वैतागले आहेत. फोन करायचे असल्यास सारखे घराबाहेर पडावे लागत आहे. नातेवाईकांशी संपर्क साधता येत नाही. मुलांना खाऊ देता येत नाही, पण २९९ रु चा रिचार्ज मारावा लागतो. याबाबत तक्रारी करूनही कंपनीने दखल घेतली नाही.त्यामुळे मुठेवाड ग्रामसभेत ठराव करून त्याची प्रत तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांना जेष्ठ नागरिक संघटना अध्यक्ष वसंतराव मुठे यांनी दिली. दखल न घेतल्यास जीओच्या कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा मुठे यांनी दिला आहे.

## नेवासा फाटा येथे माता रमाई जयंती साजरी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**हंडीनिमगाव** : नेवासा फाटा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात माता रमाई यांची जयंती उत्साहात साजरी करुन अभिवादन करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे अब्दुल शेख, सरपंच दादा निपुंगे, सतीश कावरे, मराठा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे, रिपाईचे तालुकाध्यक्ष सुशिल धायजे, पप्पू इंगळे, प्रा. सातुरे, बी. बी. पंडीत, पप्पु कांबळे, पोलीस पाटील आदेश साठे, पत्रकार राजेंद्र वाघमारे, संजय बनसोडे, साईनाथ शिरसाठ,सनी पाटोळे अउपस्थित होते. रमाईंच्या त्यागामुळे आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण जगाचा उद्धार केला. त्यांच्या खंबीर साथीमुळे जगात डॉ. बाबासाहेबांचे यशस्वी कार्य दिमाखात झळकत असल्याचे सातुरे यांनी सांगितले. सुरेश गायकवाड, बी.बी. पंडीत, संजय बनसोडे यांची भाषणे झाली. यावेळी वैभव मगर, संजय वाघमारे, संदिप साळवे, उपस्थित होते.

## राष्ट्र घडविण्यात रमाई मातांचे मोलाचे योगदान : कोल्हे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरात आयोजित मिरवणुकीत कोल्हे कारखाना अध्यक्ष विवेक कोल्हे सहभागी झाले व त्यांनी अभिवादन केले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे राष्ट्रपुरुष आपल्या देशात घडले. त्यांच्या अद्वितीय कार्याच्यामागे माता रमाई यांनी केलेला त्याग हा अविस्मरणीय आहे. या महान त्यागामुळेच गौरवशाली राष्ट्र घडते आहे. कारण प्रतिकूल काळात त्याग आणि समर्पणाची ज्योत त्यांनी प्रज्वलित केली. त्यामुळेच आजचे सुवर्णक्षण देशाला लाभल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

देश राष्ट्रपुरुषांनी दिलेल्या विचारावर घडत असतो. भारताला जगातील सर्वात आदर्श राज्यघटना बहाल करणारे घटनाकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची संपत्ती मिळाली आहे. आज देश पुढे घेऊन जाण्यासाठी न्याय, समता,ब धुता ही मूल्य जतन करणे हा खरा आदर्श आहे. माता रमाई यांच्या जीवनात अनेक प्रसंगाना त्यांनी धीराने तोंड दिले त्यामुळे बाबासाहेब आंबेडकर यांना देशासाठी काम करताना मोलाची साथ लाभली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सर्व जडणघडणीत पाठबळ रमाई यांनी दिले. सोन्याच्या दागिन्यापेक्षा वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दोन घास मिळावे याला महत्व देणाऱ्या विचारांच्या रमाई होत्या. त्यांनी समाजासाठी बाबासाहेबांच्या रूपाने एक मौल्यवान महापुरुष पुढे येत असताना त्यांना मोलाची साथ दिली ही बाब आपण जीवनात आदर्श ठेवत मार्गक्रमण करण्यासाठी ऊर्जादायक आहे. माता रमाई यांचे कार्य, त्याग आणि समर्पण यांचे स्मरण नव्या पिढीला असावे यासाठी कोपरगाव शहरात सकल आंबेडकरी समाजाच्या वतीने निघालेल्या रथयात्रेत सहभागी होत कोल्हे यांनी अभिवादन केले.याप्रसंगी आंबेडकरी चळवळीचे नेते जितेंद्र रणशूर, अध्यक्ष योगेश शिंदे, उपाध्यक्ष गौतम रणशूर, अतुल गुंजाळ, विवेक पगारे, निलेश वाघ, राजेंद्र उशिरे, मिरवणूक प्रमुख वैभव रणशूर उपस्थित होते.

## मालदाड ते चिंचोली रस्ता पूर्णत्वाकडे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यातील उत्तर भागासाठी महत्त्वाचा असणारा मालदाड ते सोनोशी चिंचोली गुरव हा १९ किलोमीटरचा रस्ता लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या पाठपुराव्यातून आता पूर्णत्वाकडे जात आहे.

उत्तर भागातील मालदाड, सोनोशी, नान्नज दुमाला, पिंपळे,काकडवाडी, पारेगाव बुद्रुक, चिंचोली गुरव, देवकवठे ,पारेगाव खुर्द या गावांना जोडणारा मुख्य रस्ता म्हणून मालदाड ते चिंचोली गुरव या रस्त्याची ओळख आहे. या रस्त्याच्या कामासाठी तत्कालीन मंत्री थोरात यांनी सातत्याने पाठपुरावा करून या १९ किलोमीटरच्या रस्त्या करता १४ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी मंजूर करून घेतला होता. याचबरोबर संगमनेर तालुक्यामधील घुलेवाडी फाटा ते गुंजाळवाडी, राजापूर, निमगाव भोजापूर, चिखली या ११ किलोमीटर रस्त्यासाठी नऊ कोटी १७ लाख रुपये, तसेच राजापूर ते चिखली रोड या तीन किलोमीटर रस्त्यासाठी तीन कोटी ७३ लाख रुपयांचा निधी यांचाही समावेश होता. निमगाव भोजापूर येथील म्हाळुंगी नदीवरील पुलास तीन कोटी रुपयांचा निधी मिळवला होता. मात्र कोरोना काळानंतर राज्यात सत्तांतर झाले आणि तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी राजकारणासाठी कामे व रस्ते रखडवून ठेवले होते. मालदाड - सोनोशी रस्त्यासाठी मालदाड येथील सरपंच गोरख नवले व नागरिकांनी उपोषणही केले. यानंतर थोरात यांनी या रस्त्याच्या कामाबाबत विधानसभेतही आवाज उठवला. व तातडीने रस्ता सुरू करण्याची मागणी केली होती. त्यानंतर सप्टेंबर २०२३ मध्ये या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली. आता हा रस्ता पूर्णत्वाकडे येत आहे. नान्नज दुमाला, सोनोशी, मालदाड या गावांमध्ये गावठाण परिसरामध्ये पूर्ण रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्यात आले आहे. तसेच रस्त्यांच्या दुतर्फा मालदड घाटामध्ये साईड गटार बांधण्यात आली आहे. इतर सर्व ठिकाणी रस्त्यांचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. आवश्यक ठिकाणी मोठमोठे पाईपही टाकण्यात आले आहेत.

## माता रमाईंच्या त्यागामुळेच बहुजन समाज घडला : डॉ. घुले



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : येथे फुले, शाहू, आंबेडकर नेवासा तालुका एकता समितीच्यावतीने माता रमाई यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. माता रमाईच्या त्यागामुळेच बहुजन समाज घडला असल्याचे प्रतिपादन समर्पण फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांनी यावेळी केले.

प्रारंभी माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मानवंदना देण्यात आली. डॉ. घुले म्हणाले की, माता रमाई यांनी वेळोवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना संघर्षात साथ देत समाज घडविण्यासाठी महान कार्य केले आहे. जी क्रांती झाली ती फक्त माता रमाई यांच्या पाठबळामुळेच शक्य झाले. माता रमाईच्या कार्याचा आदर्श सर्व बहुजन समाजाने घ्यावा व जीवनात अंगीकार करावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी बामसेफचे गणपत मोरे, बसपाचे हरिष चक्रनारायण,जळका बुद्रुकचे सरपंच ॲड. राजेंद्र पंडित, बापूराव आढागळे यांनी मनोगत व्यक्त केले. सामाजिक कार्यकर्ते शांताराम गायके, एस टी महामंडळाचे राकेश सोनवणे, संतोष चव्हाण प्रकाश चव्हाण, मनेष चव्हाण, आकाश चव्हाण उपस्थित होते. विकास चव्हाण यांनी आभार मानले

## जनतेच्या अडचणी सोडवण्यासाठी 'यशोधन' तत्पर : डॉ. थोरात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली जनतेच्या सेवेसाठी २४ तास कार्यरत असलेले यशोधन जनसंपर्क कार्यालय तालुक्यासह जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांसाठी मध्यवर्ती मदतीचे केंद्र ठरले असून, जनतेच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी सदैव तत्पर असल्याचे प्रतिपादन युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात यांनी केले.

यशोधन जनसंपर्क कार्यालयात अहमदनगर जिल्ह्यातील विविध पदाधिकारी व अधिकारी यांनी भेटी दिल्या. याप्रसंगी त्या बोलत होत्या. थोरात म्हणाल्या की, स्वातंत्र्यसेनानी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या जनसेवेचा वारसा घेऊन लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने काम केले आहे. जनतेचे मोठे प्रेम त्यांच्यावर असून तालुक्यात प्रत्येक गावात विकासाची कामे त्यांनी राबविली आहेत. जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध असणाऱ्या या लोकनेत्याच्या यशोधन कार्यालयाने तालुक्यातील नागरिकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. या पुढील काळातही तत्परतेने सर्व विभागांमधून येणाऱ्या नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी मदत केली जाईल.संगमनेर तालुका हा विस्ताराने मोठा असून १७१ गावे आणि २४८ वाड्यावस्त्या असून प्रत्येक गावातील विकासासाठी बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने काम केले आहे. याचबरोबर निळवंडे धरण व कालव्याचे काम पूर्ण करून दुष्काळी भागाला पाणी देण्याचे ऐतिहासिक काम केले आहे. त्यामुळे आज तळेगाव गटातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतात पाणी आले आहे. वितरिकांच्या माध्यमातून हे पाणी जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी थोरात पाठपुरावा करत आहे. तालुक्यातील नागरिकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी शहरात मध्यवर्ती ठिकाणी सुरू केलेले यशोधन कार्यालय हे २४ तास कार्यरत आहे. यशोधन कार्यालय हे मदतीचे केंद्र ठरल्याने जिल्ह्यातील व राज्यातील विविध राजकीय नेत्यांच्या कार्यालयाने या कार्यालयास भेट देऊन अनुकरण केले आहे. याचबरोबर उत्तर प्रदेशातील अमेठी मतदार संघातही यशोधन कार्यालयाचा पॅटर्न राबवण्यात आला आहे.

## माता रमाईंचे जीवन त्यागाचे प्रतीक : काळे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव तालुक्यासह शहरात त्यागमूर्ती रमाईमाता आंबेडकर यांची जयंती शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकात शेकडो भीम सैनिकांच्या उपस्थितीत उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मा. आ.अशोकराव काळे यांनी रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

काळे म्हणाले की, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि आदर्श हे समाजातील अत्याचार आणि अंधश्रद्धा दूर करण्यात मदतगार ठरले. त्यागमूर्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रमाईमातांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना केवळ वैयक्तिक जीवनातच नाही तर सामाजिक आणि राष्ट्रीयकार्यात देखील प्रेरणा दिली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाच्या विविध टप्प्यांमध्ये माता रमाईंचे मोलाचे योगदान होते. ज्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य जसे भारतीय समाजासाठी मार्गदर्शक म्हणून काम करते त्याप्रमाणेच माता रमाईंचा त्यागही समाजातील प्रत्येक स्त्रीला सामर्थ्य देणारा असून त्यागमूर्ती म्हणून रमाईमातांचे आदर्श जीवन त्याग आणि समर्पणाचे प्रतीक होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते उपस्थित होते.

## पर्यावरण संवर्धनासाठी जल, जंगल, जमिनीची जपवणूक गरजेची : फुलारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कुकाणा** : निर्सगाचे संतुलन आणि पर्यावरण संवर्धनासाठी जल, जंगल, जमिनी, जन आणि जनावरं या पंचसूत्रीची जपवणूक करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जल व पर्यावरणमित्र सुखदेव फुलारी यांनी केले.

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील श्री मारुतराव घुले पाटील शिक्षण संस्थेच्या जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयाच्यावतीने प्रवरासंगम येथील सिद्धेश्वर मंदिरात आयोजित मूल्य शिक्षण कार्यशाळेंतर्गत पर्यावरण संवर्धन व गोदावरी नदी स्वच्छता या विषयावर मार्गदर्शन करतानाफुलारी बोलत होते. विश्वस्त डॉ. नारायणराव म्हस्के अध्यक्षस्थानी होते. प्रा. विकास कसबे, राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा विभाग समन्वयक प्रा. डॉ. संजय महेर, कार्यक्रम अधिकारी डॉ. मोहिनी साठे, प्रा. योगेश लबडे, प्रा. वैभव लाटे, रमेश भालेकर आदी उपस्थित होते.

फुलारी म्हणाले की, गोदावरी नदीचा उगम नाशिक मधून होऊन ती बंगालच्या उपसागराला मिळते. तिला दक्षिण गंगा म्हणून संबोधले जाते. नदी ही केवळ पाणी वहन करणारी व्यवस्था नसून ती एक परिसंस्था आहे. प्रत्येक एक किलोमीटरवर जैवविविधता आणि पाण्याचे गुणधर्म बदलत असतात. नदीच्या विविध टप्प्यांत प्रवाह आणि काठ या ठिकाणी वेगवेगळ्या परिसंस्था नांदत असतात. नदी उगमापासून



संगमापर्यंत किंवा समुद्राला मिळेपर्यंत ती वेगवेगळी रूपे घेते. तिच्या वेगवेगळ्या भूमिकांमुळे परिसंस्थेमध्येही ती अत्यंत मोलाची ठरते. सामान्यतः नदीच्या उगमाचे पाणलोट, पुढे नदीचे पाणलोट, तिचे सपाटीवर वाहणे, पुढे एखाद्या मोठ्या नदीला किंवा समुद्राला जाऊन मिळणं हे नदीच्या आयुष्यातील महत्त्वाचे टप्पे आहेत. या सर्वच टप्प्यांमध्ये अनेक उपटप्पेही असतात. उगम, धबधबे, पाणलोट, काठ, तळ, डोह, डबकी, वळणं, प्रपात ते खाडीमुख अशा नदीच्या प्रत्येक रूपात वेगवेगळी स्वतंत्र व वैशिष्ट्यपूर्ण अशी परिसंस्था तयार होत असते. नदीपात्रात उगमाजवळ बहुधा मोठाले खडक असतात. मोठमोठे दगड आणि त्याभोवती तयार झालेले खाचखळगे हे एक स्वतंत्र आश्रयस्थान असते. तिथे वाढणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण वनस्पती, कीटक आणि जलचरांच्या प्रजाती असतात. त्यांची स्वतंत्र परिसंस्था असते. डोंगरातून पाणी खाली झेप घेते, अशा ठिकाणी लहान मोठे धबधबे असतात. इथेही विशिष्ट अशी उभी परिसंस्था तयार होते. येथे इतरत्र न आढळणारी विशिष्ट झुडपे, वेली, कीटक आणि पक्षी सापडतात. पुढे नदी थोडी सपाटीला आल्यानंतर पात्रातील दगडांचा आकार हळूहळू छोटा होत जातो. नदीचे प्रदूषण रोखणे हे एक मोठे आव्हान आहे. नदीचे पावित्र्य राखणे ही आपणा सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. नदी आपली माता आहे. त्यामुळे नदीमध्ये रक्षा-जुनी कपडे-निर्माल्य टाकून तिचे पवित्र नष्ट करू नये, असे आवाहन त्यांनी केले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक करण फोलाणे, तेजस्विनी गायकवाड, तृप्ती मिसाळ ,निकिता गाडे, शिवानी मेथे, जोत्सना बडे, वृशाली मते, प्रकाश जावळे, सौरभ वाळुंजकर, संकेत ताकटे यांनी मनोगत व्यक्त केले. स्वयंसेवकांनी सिद्धेश्वर मंदिराजवळील गोदावरी नदी काठी स्वच्छता मोहीम राबवली. सोनई महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बाळासाहेब खेडकर यांचे हस्ते स्वयंसेवकांना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. डॉ.संजय महेर यांनी प्रास्ताविक केले. डॉ.मोहिनी साठे यांनी सूत्रसंचालन केले.

(पान १ वरुन)

## २७ वर्षांनी दिल्लीत कमळ फुललं !

मुख्यमंत्री आतिशी मार्लेना मात्र विजयी झाल्या.नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघात आम आदमी पार्टीचे अरविंद केजरीवाल, भाजपचे परवेश वर्मा आणि काँग्रेसचे संदीप दीक्षित यांच्यात अत्यंत चुरशीची लढत झाली. नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघातून भाजपचे परवेश वर्मा यांनी अरविंद केजरीवाल यांचा पराभव केलाय.

तर, जंगपुरा विधानसभा मतदारसंघात आम आदमी पक्षाने माजी उपमुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्री मनीष सिसोदिया यांना उमेदवारी दिली होती. तर भाजपकडून तरविंदर सिंग मारवाह आणि काँग्रेसकडून फरहाद सुरी निवडणूक रिंगणात उतरले होते. मनीष सिसोदिया हे पहिल्यांदाच जंगपुरा येथून मैदानात उतरले होते. याआधी ते पटपडगंजमधून निवडणूक लढवत होते. यावेळी पक्षाने शिक्षणतज्ज्ञ अवध ओझा यांना पटपडगंजमधून उमेदवारी दिली होती. जंगपुरा मतदारसंघातून आम आदमी पक्षाचे उमेदवार मनीष सिसोदिया यांचा पराभव झाला आहे. या जागेवर भाजपचे तरविंदर सिंग मारवाह यांनी १८४४ मतांनी विजय मिळवला आहे.

भाजपाचे कमल बग्री यांचा पराभव करत आम आदमी पक्षाचे इम्रान हुसैन यांचा बल्लीमारन मतदारसंघात विजय झाला आहे. त्यांनी कमल बग्री यांचा २९ हजार ८२३ मतांनी पराभव केला.

दिल्लीच्या निवडणुकीत भाजपच्या विजयापेक्षा काँग्रेसच्या हाती भोपळा येण्याची अधिक चर्चा झाली. इंडिया आघाडीत एकत्र असूनही काँग्रेसनं आपविरोधात आक्रमक प्रचार केला होता. आप आणि काँग्रेसमध्ये जागावाटपाच्या मुद्द्यावर बोलणी फिसकटली. आपनं दिल्ली निवडणुकीत काँग्रेसकडे पाठिंबा मागितला होता. पण नंतर त्याला नकार दिला. काँग्रेस नेत्यांनी आप हाच दिल्लीतील प्रमुख विरोधी पक्ष मानला. इंडिया आघाडीला कमकुवत करण्यासाठी आपच्या नेत्यांनी काँग्रेसला जबाबदार धरलं. आपनं काँग्रेसवर भाजपाला फायदा व्हावा अशा पद्धतीने मतांचं ध्रुवीकरण केल्याचा आरोप केला. आप आणि काँग्रेस हे दोन्ही पक्ष एकाच प्रकारच्या मतदार वर्गासाठी प्रयत्न करत होते. आप आणि काँग्रेस यांच्यातील वादाचा शेवटी भाजपाला फायदा झाल्याचे निकालामुळे स्पष्ट झाले.

निकालानंतर कार्यकर्त्यांशी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, आपदावाल्यांनी त्यांचा प्रत्येक घोटाळे लपवण्यासाठी रोज नवीन षडयंत्र रचले. पण आता दिल्लीचा जनादेश आला आहे. मी गॅरंटी देत आहे कीं पहिल्या विधानसभा अधिवेशनातच कॅगचा अहवाल सभागृहात ठेवला जाईल. भ्रष्टाचाराच्या प्रत्येक प्रकरणाची चौकशी होणार आहे. ज्याने लूट केली आहे ती परत करावी लागेल.

शेजारील राज्यात भाजपची सरकारे आहेत, हा अतिशय आनंददायी योगायोग आहे. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच या सर्व भागात भाजपची सरकारे एकत्र आली आहेत. हा एक योगायोग प्रगतीचा मार्ग उघडणार आहे. या संपूर्ण परिसरात मोबिलिटीवर भरपूर काम करण्याचा आमचा प्रयत्न असेल. आज देश झपाट्याने शहरीकरणाकडे वाटचाल करत आहे. पूर्वीची सरकारे शहरीकरणाला ओझे आणि आव्हान मानत होती. माझे मत आहे की शहरीकरण ही एक संधी आहे. शहरीकरण हे गरीब आणि वंचितांना सक्षम करण्याचे माध्यम आहे. दिल्ली हे भारताचे प्रवेशद्वार आहे, म्हणून ते भारतातील सर्वोत्तम पायाभूत सुविधांना पात्र आहे. आता आम्ही दिल्लीकरांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी पूर्ण ताकदीने काम करू, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.आज अयोध्येतील मिल्कीपूरमध्येही भाजपला विजय मिळाला. प्रत्येक वर्गाने मोठ्या प्रमाणात भाजपला मतदान केले आहे. दिल्लीतील निषेधाचे राजकारण, संघर्ष आणि प्रशासकीय अनिश्चिततेमुळे दिल्लीतील जनतेचे मोठे नुकसान झाले आहे. आज तुम्ही सर्व दिल्लीकरांनी दिल्लीच्या विकासातील एक मोठा अडथळा दूर केला आहे. या लोकांनी मेट्रोचे काम रोखले, यांनी झोपडपट्टीवासीयांना घरे देण्यापासून रोखले, यांनी दिल्लीतील लोकांना आयुष्मान योजनेचा लाभही मिळू दिला नाही. आता दिल्लीतील जनतेने स्पष्ट संदेश दिला आहे की, त्यांना सुशासन हवे आहे. त्यांनी डबल इंजिनचे सरकार निवडले असून दिल्लीच्या जनतेची सेवा करण्यासाठी आम्ही रात्रंदिवस काम करू, असं आश्वासन पंतप्रधान मोदींनी दिले.राजकारणात शॉर्टकट आणि लबाडीला स्थान नाही. जनतेने शॉर्टकटचे राजकारण करणाऱ्यांना शॉर्टकट दाखवला. लोकसभा निवडणुकीत दिल्लीच्या जनतेने मला कधीही निराश केले नाही. २०१४, २०१९ आणि २०२४ या तिन्ही निवडणुकांमध्ये दिल्लीच्या जनतेने भाजपला सात जागांवर विजय मिळवून दिला. दिल्लीची सेवा करू न शकल्याची वेदना माझ्या मनात होती. पण आज दिल्लीनेही माझी विनंती ऐकली. २१व्या शतकात जन्मलेल्या पिढीला पहिल्यांदाच दिल्लीत भाजपचे सुशासन दिसेल. भाजपच्या सुशासनावर देशाचा विश्वास आहे.

### दिल्लीत राष्ट्रवादीच्या पदरी निराशा

गती मिळेल. चांगले रस्ते, स्वच्छ पाणी, उत्तम शिक्षण, दर्जेदार आरोग्य सुविधांचं, देशाच्या राजधानीचं सर्वांगसुंदर शहर हे दिल्लीकरांचे स्वप्न पूर्ण होईल. दिल्लीतील भाजपाच्या यशामागे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या कष्ट व निवडणूक व्यवस्थापनाचेही मोठे योगदान आहे. दिल्ली भाजपाचे अध्यक्ष वीरेंद्र सचदेव आणि त्यांच्या टीमने घेतलेली मेहनतही महत्वाची ठरली, असे विश्लेषण अजित पवार यांनी केले.

## जयंतीचा फलक फाडल्याने भीमसैनिक आक्रमक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**कोपरगाव( प्रतिनिधी )-**
शहरातील नगरपालिकेच्या माधवबागेसमोर लावलेल्या माता रमाई आंबेडकर जयंतीच्या फलक अज्ञात व्यक्तीने फडल्याने भीमसैनिक आक्रमक झाले होते. यावेळी भीमसैनिक महिला भगिनींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासमोर ठिय्या आंदोलन करत, नगर मनमाड महामार्गावातील साईबाबा कॉर्नर येथे चक्काजाम आंदोलन करत कोपरगाव बंदची हाक दिली होती. कोपरगाव शहरातील छत्रपती संभाजी महाराज पुतळ्याजवळील माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त लावण्यात आलेला फलक बुधवारी दि. ५ रोजी फाडण्यात आला होता. ही घटना ताजी असतानाच शनिवारी (दि. ८) पुन्हा माधव बागेसमोर लावण्यात आलेला फलक फाडण्यात आल्याचे सकाळी सातच्या सुमारास निदर्शनास आले. आरोपीला अटक होईपर्यंत हटणार नाही, असा निर्धार आंदोलनकर्त्यांनी केला. काही वेळातच संपूर्ण कोपरगाव शहर बंद झाले. दुपारी बाराच्या सुमारास काही भीमसैनिकांनी आपला मोर्चा नगर-मनमाड रस्त्याकडे वळविला. साईबाबा कॉर्नरवर जाऊन रस्ता रोखला. पोलिसांनी आरोपीस अटक करण्याचे आश्वासन दिले.



सोमवार पर्यंतची मुदत पोलिसांना आंदोलकांनी दिली. त्यानंतर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा दिला. अडीच तासानंतर खोळंबलेली वाहतूक सुरळीत झाली. तोपर्यंत नगर व येवल्याच्या दिशेने वाहनांच्या लांबच-लांब रांगा लागल्या होत्या.

## दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**राहुरी प्रतिनिधी**
तालुक्यातील म्हैसगाव येथे डॉ. सुभाष काकडे कॉलेज मधील दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ आयोजित केला होता त्यानिमित्ताने राहुरीचे पोलीस अधीक्षक संजय ठेंगे यांनी कॉलेजमधील विद्यार्थी व त्यांचे पालक यांना दुपारी एक ते दोन वाजेपर्यंत कायदेविषयक मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की विद्यार्थीनींनी व विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर, सायबर सुरक्षेबाबत योग्य ती काळजी घ्यावी व इतर अनेक विषयावर विद्यार्थी व पालकांना आपल्या वैयक्तिक सुरक्षेविषयी मार्गदर्शन केले. पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत विद्यार्थी व पालकांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद या कायदेशीर कार्यशाळेला दिला आहे. पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या या जनजागृती बद्दल व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबद्दल घेतलेल्या या कायदेविषयक कार्यशाळेमुळे नागरिक व विद्यार्थी समाधानी आहेत.

## नेवासा येथील श्रीमद् भागवत कथेच्या प्रसंगी भगवान श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**नेवासा** :तीर्थक्षेत्र नेवासा नगरीचे ग्रामदैवत श्री मोहिनीराजांच्या यात्रा महोत्सवाच्या निमित्ताने श्री मोहिनीराज मंदिर प्रांगणात दुपारी २ ते सायंकाळी ६ या वेळेत वृंदावन येथील भागवताचार्य देवी वैभवीश्रीजी यांच्या सुश्राव्य वाणीतून सुरू असलेल्या श्रीमद भागवत कथेच्या चौथ्या दिवशी भगवान श्रीकृष्ण जन्मोत्सव शनिवारी पुष्पवृष्टी करून भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कथेच्या निरूपण प्रसंगी भागवताचार्य देवी वैभवीश्रीजी यांनी भगवान श्रीकृष्ण परमात्म्याच्या अवतार कार्याचे वर्णन केले.या प्रसंगी झालेल्या जन्मोत्सव सोहळयाच्या प्रसंगी वृंदावन येथील गायनार्चा मदन गोपाल शर्मा यांनी गायनासह ऑरगॅनची,तर नेवासा येथील संगीत विशारद कृष्णा कुलकर्णी यांनी उत्कृष्ट अशी तबल्याची संगीतसाथ दिली. वृंदावन येथील सेविका कु.मानसी आवारे,कु.दिव्यांनी पाटील,अनुराधा,अरुणा यांनी देखील सहगायनाची साथ दिली.0 थेच्या प्रसंगी श्रीकृष्ण जन्माचे वर्णन करत असतांना श्रीराम मंदिराचे पुजारी अंकुश लवडकर यांनी वासुदेव यांची भूमिका बजावत एक वर्षाचे बाळाला टोपलीत घालून आणले यावेळी उपस्थित भाविकांनी टोपलीवर पुष्पवृष्टी केली.कृष्णरुपी बाळाला पाळण्यात घालण्यात येऊन ''किती सांगू मी सांगू कुणाला...आज आनंदी आनंद झाला''या गाण्यावर श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा करण्यात आला पस्थित महिला भाविकांनी तल्लीन होऊन भगवान श्रीकृष्ण परमात्म्याच्या आगमन प्रसंगी हात उंचावून टाळया वाजवत ताल धरला.समारोप प्रसंगी भानसहिवरा येथील शिनाई देवस्थानचे महंत बालब्रम्हचारी महंत आवेराजजी महाराज,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक किशोर निर्मळ,जिल्हा कार्यवाह लहू शिंदे,सतीश मुळे व सौ.साधनाताई मुळे,राजेंद्र मुथ्था,सौ.मनिषा मुथ्था,कु. स्नेहल मुथ्था,पत्रकार सुधीर चव्हाण व सौ. संगिता चव्हाण,सोलट साहेब,ज्ञानेश्वर डहाळे,रोहिदास गारूळे, अनिल बडवे, यशवंत शेटे,महेश शिंदे,वसंत सराफ यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते भागवताची सपत्नीक महाआरती करण्यात आली.



-नेवासा नगरीचे ग्रामदैवत श्री मोहिनीराजांच्या यात्रा उत्सवाच्या निमित्ताने सुरू असलेल्या भागवत कथेमध्ये श्रीकृष्ण जन्म सोहळा शनिवारी सायंकाळी साजरा करण्यात आला.यावेळी उपस्थित भाविक दिसत आहे.
**(छाया-सुधीर चव्हाण नेवासा)**

## डॉ. मकासरे यांच्यावरील गुन्ह्यांची उच्चस्तरीय चौकशी करा ; महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांना निवेदन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**राहूरी प्रतिनिधी**
तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते डॉ विजय मकासरे यांच्या वर दाखल करण्यात आलेले गंभीर व संशयास्पद गुन्ह्याची उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आश्वासन पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांनी नाशिक येथे सर्व पक्षीय व विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना दिले. तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते डॉ विजय मकासरे यांच्यावर एकाच महिलेने एका दिवसात वेगवेगळ्या पहिल्यांदा मोबाईल चोरीची तर दुसऱ्यांदा मंगळसूत्र चोरीच्या गंभीर गुन्ह्यांची नोंद केली. यात विशेष म्हणजे डॉ मकासरे यांनी फिर्यादी मध्ये नमूद केलेली वेळ व त्या महिलेच्या फिर्यादीचे वेळ ही एकच असल्यामुळे तक्रारी बाबत शंका व्यक्त केली जात आहे. त्यांनतर त्याच दिवशी म्हणजे तीन फेब्रुवारी रोजी रात्री आठ वाजे दरम्यान डॉ मकासरे यांच्यावर पोस्को सह गंभीर गुन्ह्याची पुन्हा नोंद करण्यात आली. त्यामुळे या प्रक्रियेमध्ये कोणीतरी या घटना पोलीस स्टेशनला नोंदविण्यास सहकार्य करत असल्याचे राहुरी तालुक्यातील विविध सामाजिक व राजकीय संघटनाच्या पादाधिकारी यांच्या लक्षात आल्या मुळे रिपाई (आठवले गट)भीम आर्मी स्टुडंट्स फेडरेशन, सत्य शोधक लहुजी क्रांती सेना, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट रिपाई कवाडे गट, भारिप, रिपाई गवई गट, बहुजन युथ पँथर, महादेव कोळी संघटना, रिपब्लिकन युवा सेना, महाराष्ट्र फ्रीडम पॉवर पत्रकार संघ, वंचित बहुजन आघाडी, राष्ट्रीय दलित न्याय हक्क आंदोलन या संघटनांनी एकत्र येत नाशिक येथे पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांची भेट घेऊन याप्रकरणी चौकशी लावण्यासंदर्भात निवेदन दिले. वरील संघटनाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी निवेदन सादर करून चौकशी करून डॉ मकासरे यांच्यावर दाखल झालेले गुन्हे रद्द करण्यात यावेत अशी मागणी केली आहे.

## राष्ट्रीयस्तर नृत्य स्पर्धेत वेदिका एरंडे प्रथम





**अकोले प्रतिनिधी**
नागपूर येथे भारतीय नृत्य नटराज संस्थेच्यावतीने आयोजित राष्ट्रीयस्तर नृत्य स्पर्धेत अकोले येथील वेदिका सुनील एरंडे हिने बॉलिवूड नृत्य प्रकारात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. ेथे मझालेल्या राष्ट्रीय नृत्यस्पर्धेमध्ये वेदिका हिने बॉलीबुड प्रकारात उत्कृष्ट नृत्यविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. वेदिका हिने या अगोदर जिल्ह्यातील अनेक नृत्य स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले असून तिला नृत्य क्षेत्रातील योगदानाबद्दल अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. या यशाबद्दल अभिनव शिक्षण संस्थेचे मधुकरराव नवले, उपाध्यक्षा डॉ. जयश्री देशमुख, संस्थेच्या सहसचिव तथा प्राचार्या अल्फोंसा डी, कोषाध्यक्ष विक्रम नवले यांनी कौतुक केले. वेदिका हिस नृत्यशिक्षिका काव्या कदम यांचे मार्गदर्शन लाभले.

## शाळकरी मुलीच्या तोंडावर स्प्रे मारून अपहरणाचा प्रयत्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**संभाजीनगर :** सिडकोतील चैत्यन्य तुपे याच्या झालेल्या अपहरणाची घटना ताजी असतानाच आज सकाळी ७वाजेच्या सुमारास शाळेत जाणाऱ्या १४ वर्षीय मुलीच्या तोंडावर स्प्रे मारून अपहरणाचा प्रयत्न झाल्याने खळबळ उडाली आहे. दरम्यान पोलिसांनी या घटनेची दखल घेऊन तात्काळ घटनास्थळी भेट दिली आणि मुलीची विचारपूस सुरु केली आहे. या बाबतची माहिती अशी की पुंडलिकनगर परिसरातील १४ वर्षीय विध्यार्थिनी सकाळी ७ वाजेच्या सुमारास शाळेत जात असताना परिजातनगर उद्याना जवळ एका व्यक्तीने तिच्या तोंडावर स्प्रे मारला त्यामुळे ती बेशुद्ध झाली. शुद्धीवर आल्यावर तिने घडलेली घटना घरच्यांना सांगितली. त्यांनी पुंडलिकनगर पोलिसांना कळविले. दरम्यान पोलीस निरीक्षक कुंदन जाधव यांनी तात्काळ घटनास्थळी भेट दिली. व मुलीची विचारपूस केली. पोलिसांनी तिला तात्काळ रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी तिची तपासणी केली. पण स्प्रे मारल्याची कोणतीही लक्षणे दिसून आली नाही. पोलिसांनी या प्रकरणी घटनास्थळावर आजूबाजूच्या लोकांना विचारपूस केली. या प्रकरणी पोलीसांनी दुपारपर्यंत कोणताही गुन्हा दाखल केला नव्हता. पुंडलिकनगर पोलीस या प्रकरणात अधिक तपास करीत आहेत.

## शिरसगाव शाळेत ग्रामपंचायतकडून विद्यार्थ्यांना गणवेश वाटप



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**शिरसगाव** :जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिरसगाव येथे आज शासन अनुदानातून प्राप्त दुसऱ्या गणवेशचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. सदर प्रसंगी शिरसगाव ग्रामपंचायतचे उपसरपंच संजय यादव,ग्रामपंचायत सदस्य तथा शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सुरेश मुदगुले ,महेश ताके ,शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्ष सौ माधुरी मराठे,गजानन गवारे,दत्तात्रय बकाल,नवनाथ गवारे, रवींद्र ताके निलेश यादव,संगीता क्षीरसागर संगीता कांबळे,मनीषा देशमुख,उज्वला कदम,प्रदीप दळवी, योगेश राणे इत्यादी उपस्थित होते.शासन गणवेशाचा दर्जा बघून व्यवस्थापन समितीने समाधान व्यक्त केले

## नशिबाची परिक्षा

**रविवार दि. ९ फेब्रुवारी २०२५**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२६<br>४५०<br>१४४ | ९-२ | १५६<br>२४६<br>२२८ | जोड<br>९०-१२-५४<br>०३-२८ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १९०<br>२८०<br>४६० | ०-३ | १२०<br>६७०<br>५८० | जोड<br>०९-१३-५४<br>१८-३६ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|
| -<br>सुट्ट | जोड<br>- |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| 09/12/2024 to 14/12/2024 | 168 58 170 | 224 84 347 | 488 00 299 | 114 67 359 | 677 06 277 | 667 98 378 |
| 16/12/2024 to 21/12/2024 | 479 03 157 | 468 82 589 | 679 29 667 | 379 90 226 | 560 14 455 | 114 66 367 |
| 23/12/2024 to 28/12/2024 | 578 02 589 | 699 40 235 | 199 92 345 | 116 85 780 | 569 00 136 | 800 88 260 |
| 30/12/2024 to 04/01/2025 | 580 39 144 | 379 94 257 | 229 33 599 | 447 58 125 | 344 11 470 | 178 63 337 |
| 06/01/2025 to 11/01/2025 | 388 91 100 | 178 69 135 | 358 60 127 | 449 71 128 | 350 85 267 | 390 20 370 |
| 13/01/2025 to 18/01/2025 | 180 95 357 | 138 28 279 | 236 11 588 | 679 29 270 | 390 28 350 | 470 18 189 |
| 20/01/2025 to 25/01/2025 | 257 47 458 | 800 83 148 | 149 45 357 | 260 80 145 | 256 33 689 | 489 18 369 |
| 27/01/2025 to 01/02/2025 | 289 96 349 | 589 25 267 | 250 78 369 | 690 59 478 | 580 30 550 | 270 94 167 |
| 03/02/2025 to 08/02/2025 | 136 08 189 | 267 55 357 | 280 04 239 | 678 14 149 | | |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

## माजी मुख्याध्यापक सोपानराव सानप यांचे निधन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**श्रीरामपूर** : येथील श्रीरामपूर एज्युकेशन सोसायटी हायस्कूलचे माजी मुख्याध्यापक सोपानराव एकनाथराव सानप यांचे हृदयविकाराच्या झटक्याने आज सकाळी दुःखद निधन झाले. ते ८० वर्षांचे होते. प्रगतशील शेतकरी नितीन व सचिन सानप यांचे वडील, चंद्रकांत सानप यांचे धाकटे बंधू, डोंबिवली येथील प्रसिद्ध उद्योजक संजय सानप यांचे चुलते होते. श्रीरामपूर एज्युकेशन सोसायटी हायस्कूलचे मुख्याध्यापक पद त्यांनी तीस वर्षापेक्षा जास्त काळ भूषविले. त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवला एक विद्यार्थी प्रिय शिक्षक आणि मुख्याध्यापक म्हणून ते शहरात परिचित होते. त्यांचे अनेक विद्यार्थी आज समाजामध्ये विविध पदांवर यशस्वीरित्या कार्यरत आहेत. लोकमान्य मंडळाचे सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. सानप सरांच्या निधनाबद्दल मानवता संदेश फाउंडेशन चे अध्यक्ष तथा शिक्षक बँकेचे माजी चेअरमन सलीमखान पठाण, सय्यद बाबा ऊर्स कमिटीचे अध्यक्ष मुन्ना पठाण, ॲड शफी शेख,शिक्षण मंडळाचे माजी उपसभापती शेख अकिल सुन्नाभाई, रज्जाक पठाण, सत्यनाथ शेळके, ॲड खलील शेख मुंबई यांच्यासह त्यांचे सर्व विद्यार्थ्यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे.



## त्रिमूर्ती तेलकूडगावच्या खेळाडूंची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**नेवासा :** आष्टेडू आखाडा फेडरेशन ऑफ भारत मर्दानी खेळ १९ वी राष्ट्रीय ज्युनियर व सिनियर लेव्हल-आष्टेडू आखाडा चॅम्पियन २०२४-२५ स्पर्धा, वसंतराव नाईक सरकारी कॉलेज नागपूर व महाराष्ट्र राज्य आष्टेडू आखाडा असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १ ते ३ फेब्रुवारी दरम्यान वसंतराव नाईक सरकारी कॉलेज, नागपूर येथे मोठ्या उत्साहात पार पडल्या.

सदर स्पर्धेमध्ये त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित,तेलकूडगाव येथील घाडगे पाटील माध्यमिक विद्यालयातील खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन करत नेहमीप्रमाणे उत्तम यश प्राप्त केले. या स्पर्धेमध्ये १४ वर्षे वयोगटात हस्तकलेमध्ये जयदीप शिंदे याने सिल्वर मेडल तसेच १७ वर्ष वयोगटात करण खोमणे,आदित्य घिगे व पार्थ घोरपडे यांनी गोल्ड मेडल प्राप्त केले.

१७ वर्ष वयोगटात स्पेअर बॅलेंसिंग मध्ये आदित्य वजीर याने गोल्ड मेडल पटकावले. शिव कलेमध्ये गौरव तांगडे याने गोल्ड मेडल पटकावले तर १९वर्षे वयोगटात हस्तकलेमध्ये ओम डांगे याने गोल्ड मेडल पटकावले. विद्यालयातील मुलींनीही आपल्या उत्कृष्ट कौशल्याचा प्रदर्शन करत यश प्राप्त केले त्यामध्ये १४ वर्ष वयोगटात हस्तकलेमध्ये श्रद्धा साखरे हिने सिल्वर मेडल तर १७ वर्ष वयोगटात शिव कलेमध्ये आर्या वाघमारे हिने गोल्ड मेडल पटकावले तसेच स्पेअर बॅलेंसिंग मध्ये फिरदोस शेख हिने गोल्ड मेडल, हस्तकलेमध्ये आरती गागरे व साक्षी तांदळे यांनीही गोल्ड मेडल प्राप्त केले. तैवान येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली. वरील सर्व खेळाडूंना मास्टर अनिल मिसाळ यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी खेळाडूंचे त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संस्थेचे संस्थापक साहेबराव घाडगे पाटील,अध्यक्षा अँड.सौ. सुमतीताई घाडगे पाटील, उपाध्यक्षा स्नेहलताई घाडगे पाटील,सचिव मनिष घाडगे,प्रशासक मनिषा राऊत,प्राचार्य भाऊसाहेब दुधाडे यांनी अभिनंदन केले.

## वळण येथे जादूटोण्याचा प्रकार



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**वळण** :येथे काल रात्री चंद्रकांत जाधव यांच्या हॉटेलच्या दरवाज्यावर कोणीतरी अज्ञात जादूटोणा वाल्यांनी पूजा केलेले लिंब ,गुलाल कुंकू टाकल्याचा प्रकार घडला आहे. चंद्रकांत जाधव सकाळी दुकान उघडण्याकरता आले असताना त्यांना त्यांच्या कोणीतरी लिंब टाचण्या हळद-कुंकू वाहून गेले असल्याचे लक्षात आले. वळण गावात या विषयाची चर्चा झाली. आज देखील वळण मध्ये कोणीतरी जादूटोणा करतो की काय ? येथील नागरिक महिलावर्ग घाबरून गेले आहे हा प्रकार जादूटोळण्याचा वळण मध्ये कधीच नव्हता पण असा प्रकार गाळ्यांमध्ये घडल्यामुळे नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहेत .

## भिमाबाई चौरे काळाच्या पडद्याआड..

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**पारनेर :** महाराष्ट्राचे थोर संत आत्मज्ञानी गणपत बाबा चौरे यांच्या आध्यात्मिक परंपरेच्या माध्यमातून गेले अनेक दशके संपूर्ण महाराष्ट्रभर ढोलकी, डफ-तुनतुन्याच्या भेदीक भजन सेवेच्या माध्यमातून अध्यात्माचा प्रचार व प्रसार करत सर्वधर्मसमभाव साधत अंधश्रद्धा निर्मूलनचे कार्य अखंडित करणारे श्री सत्य अविनाश पारख समाजाचे पाईक असणारा चौरे परिवाराचे व गणपत बाबांचे जेष्ठ चिरंजीव ब्रह्मनिष्ठ हरिदास महाराजांच्या सुनबाई तसेच प.पू.स. किसन महाराज चौरे यांच्या धर्मपत्नी भिमाबाई किसन चौरे यांचे नुकतेच वृद्धपकाळाने निधन झाले. त्या ९६ वर्षांच्या होत्या. संसार करून परमार्थ साधणारा व अध्यात्माचे उपासक असणारा हा चौरे परिवार, या परिवारातील माता कै.भीमाबाई चौरे यांनी गेले अनेक दशके आपल्या घराण्याची परंपरा सांभाळत धार्मिक वारसा जतन करत आपल्या मुलांना धार्मिक व सामाजिक संस्कार देण्याचे कार्य केले आहे.प .पू .स . किसन बाबा चौरे यांचा प्रपंच नेटका करणाऱ्या त्यांच्या दोन धर्मपत्नी , कै.भीमाबाई व कै.ताराबाई किसन चौरे या दोन भगिनींनी चौरे परिवाराची धुरा ह्यात असताना व्यवस्थित सांभाळत आपल्या पाल्यांना उच्चशिक्षित बनवत घराण्याचा पारंपारिक अध्यात्मिक शैक्षणिक व सामाजिक वारसा जतन करण्याचे अलौकीक कार्य केले.



# भाजपच्या दिल्लीतील विजयाचा पाथर्डीत जल्लोष

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** दिल्ली विधानसभा निवडणुकीत ७० पैकी ४८ जागेवर भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या घवघवीत यशाचा पाथर्डी तालुका व शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने आमदार मोनिका राजळे यांच्या नेतृत्वाखाली कासारपिंपळगाव येथील सिद्धसावली निवासस्थासमोर तसेच शहरातील नाईक चौकात विजयाच्या घोषणा देत फटाके फोडून जल्लोष साजरा केला.

दिल्ली विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल पाथर्डी तालुका व शहर भाजपाच्या वतीने भारतीय जनता पार्टीचा विजय असो, देश का नेता कैसा हो नरेंद्र मोदी जैसा हो,भारत माता की जय,वंदे मातरम अशा घोषणा देत फटाके फोडून एकमेकांना पेढे भरत जल्लोष करत आनंदोत्सव साजरा केला.यावेळी माजी उपनगराध्यक्ष नंदकुमार शेळके,भटके विमुक्त आघाडीचे प्रदेश सरचिटणीस अशोकराव चोरमले, भाजपाचे शहराध्यक्ष बंडू बोरुडे,माजी शहराध्यक्ष अजय भंडारी,शिवसेनेचे जिल्हा उपाध्यक्ष अंकुश चितळे,बाजार समितीचे संचालक नारायण पालवे, प्रा.रमेश काटे,युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष सचिन वायकर,युवा मोर्चचे जिल्हा चिटणीस सोमनाथ अकोलकर,जगदीश काळे,प्रा.महेश काटे,प्रशांत शेळके,सरपंच प्रदीप पाटील,सचिन ढोले,अमोल मरकड,सुभाष भागवत,नवनाथ नरोटे आदि सह भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा.संपत गर्जे यांची निवड

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** निमगाव वाघा (ता. नगर) येथील आठव्या राज्यस्तरीय काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रवचनकार व व्याख्याते प्रा. संपत गर्जे यांची निवड करण्यात आली आहे. हे काव्य संमेलन बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त पार पडणार आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने काव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे संमेलन गावातील परिवार मंगल कार्यालयात होणार आहे, आणि या काव्य संमेलनात नवोदित कवी व नामवंत कवींचा सहभाग असणार आहे.

डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा काव्य संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी प्रा. संपत गर्जे यांची अध्यक्षपदी नियुक्ती करण्याची घोषणा केली आणि त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले. प्रा. संपत गर्जे हे पाथर्डी येथील सेवानिवृत्त शिक्षक आहेत. त्यांनी आपल्या साहित्यातून मोठा ठसा उमटवला आहे. त्यांनी २९ वर्षे पिंपरी, संत तुकारामनगर (जि. पुणे) येथील भारतीय जैन संघटना संचलित उच्च माध्यमिक विद्यालयात अध्यापन केले आहे.

प्रा. गर्जे यांना साहित्य क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदानासाठी महाराष्ट्र शासनाचा आदर्श राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार मिळाला आहे. त्यांच्या काव्यसंग्रहात शब्द आशयाचे घन, कविता : समाज आणि संस्कृती, अभंगाची मूल्यगंगा समिक्षापर ग्रंथ, सारांशलेखन एक कला यांसारख्या अत्यंत प्रभावी व प्रेरणादायी साहित्यिक कार्याचा समावेश आहे. त्यांची साहित्यिक कर्तृत्वाची दखल घेत अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कारांद्वारे त्यांना गौरवण्यात आले आहे.

प्रा. संपत गर्जे यांना काव्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवडले जाणे हे त्यांच्या साहित्य क्षेत्रातील कार्याची दखल घेणारे आहे. काव्य संमेलनाच्या निवड समितीने एकमताने त्यांना अध्यक्षपदासाठी मंजुरी दिली आणि याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

काव्य संमेलनात विविध कवींचा सहभाग असणार आहे, ज्यामध्ये समाजाच्या विविध अंगांवर प्रकाश टाकणारी कविता सादर केली जाईल. प्रा. गर्जे यांचे अध्यक्ष म्हणून मार्गदर्शन संमेलनाला एक वेगळी दिशा देईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## पाणी मिळेलच; रितसर मागणी करा : आ पाचपुते

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन कायदा २००५ नुसार चारीवर शेतीसाठी पाणी मिळण्यासाठी नोंदणीकृत पाणी वापर संस्था स्थापन करा आणि अधिकृत पाण्याची मागणी करा पाणी मिळेलच असे प्रतिपादन आमदार विक्रम पाचपुते यांनी आभार सभेत बोलताना टाकळी कडे या ठिकाणी केले आहे.

आमदार विक्रम पाचपुते यांना परिसरातील नागरिकांनी विधानसभा निवडणुकीत भरघोस मतांनी विजयी केल्याने जनतेच्या कौलाची उतराई करण्यासाठी आमदार पाचपुते यांनी तालुक्यात आभार दौरा सुरु केला आहे हा आभार दौरा आज सकाळी ९ चे सुमारास टाकळी कडेवळीत या ठिकाणी आल्यावर गावकऱ्याच्या वतीने फटक्याची आतिषबाजी करत आमदार पाचपुते यांच्या स्वागत करण्यात आले त्यावेळी गावातील नागरिकांनी कुकडी वितरिका क्र १४ ला पाणी मिळत नसल्याची तक्रार केल्यावर त्यांनी सांगितले कि आपण महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन कायदा २००५ नुसार चारीवर शेतीसाठी पाणी मिळण्यासाठी नोंदणीकृत पाणी वापर संस्था स्थापन करा आणि अधिकृत पाण्याची मागणी करा पाणी मिळेलच आणि संस्था स्थापन केल्यावर पाणी नाही मिळाले तर आम्ही त्यासाठी आवाज उठवू शकतो पाटबंधारे विभागाकडून संस्थांना घनमापन पद्धतीने पाणी मिळाल्यानंतर शेतकऱ्यांकडूनच पाण्याचे व्यवस्थापन केले जाते. या संस्थांमध्ये पदाधिकारी नेमणूक करा ते याचा पाठपुरावा करतील त्यास आमदारांनीही पाठिंबा दर्शविला आहे. त्यावेळी ग्रामपंचायत सोसायटी पदाधिकारी याच्यासह गावकरी याचेकडून आमदार विक्रम पाचपुते यांचा नागरी सत्कार करण्यात आला यावेळी महेश दरेकर,रमेश गिरमकर,गणेश झिटे यांच्यासह आभार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजप तालुका उपाध्यक्ष भानुदास खामकर हे होते त्यांच्या भाषणातील शेरोशायारीने चांगलाच हश्या पिकला होता कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोवर्धन नवले यांनी केले यावेळी सरचिटणीस भरत नवले,प्रकाश नवले तसेच ग्रामपंचायत सदस्य विष्णू इथापे घोड पाणी वापर संस्था अध्यक्ष बाळासाहेब घोलप,अशोक नवले,नवनाथ वाळूंज,महेंद्र वाळूंज,प्रफुल्ल इथापे आदी मान्यवर उपस्थित होते.

## महिलांना मारहाण करणाऱ्या जिहादी लोकांवर गुन्हे दाखल करा : आ.जगताप





प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सिद्धार्थ नगर मधील हिंदू महिलांवर नागापूर कॉटेज कॉर्नर परिसरामध्ये जिहादी लोकांनी अमाषपणे मारहाण केली. या महिला दिवसभर कष्ट करून उदरनिर्वाह करत असतात. काम केले तरच संध्याकाळची चूल पेटत असते, अशा हिंदू महिलांना त्यांची जात पाहून जिहादी लोकांकडून अमाषपणे मारहाण करण्याचे काम केले आहे. सिव्हिल हॉस्पिटल येथे जाऊन महिलांच्या तब्येतीची विचारपूस करत घटनेची माहिती घेत तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांची भेट घेऊन बाकीचे आरोपी तातडीने अटक करून महिलांना झालेल्या मारहाणीनुसार ३०७ चे कलम लावण्याची मागणी केली आहे. हिंदू महिलांवर हात उचलणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा आमदार संग्राम जगताप यांनी दिला.

सिद्धार्थ नगर मधील हिंदू महिलांना झालेल्या मारहाणी बाबत आमदार संग्राम जगताप यांनी सिव्हिल हॉस्पिटल येथे जाऊन भेट घेत विचारपूस केली. यावेळी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, सिविल हॉस्पिटलच्या अनागोंदी कारभारामुळे लाल टाकी येथील ४० वर्षीय सनी बोरुडे याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. त्याला वेळेवर उपचार मिळाले नाही आदल्या दिवशी घशाच्या त्रासाने हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करण्यात आले होते. मात्र त्याच्यावर कुठल्याही प्रकारे उपचार करण्यात आले नाही, त्याच्या नातेवाईकांशी कोणत्याही डॉक्टरांनी साधी चर्चाही देखील केली नाही. रुग्णांवर उपचारादरम्यान दिरंगाई होते या ठिकाणी आधुनिक तंत्रज्ञानाचे मशिनरी असून देखील रुग्णांना त्याचा उपयोग होताना दिसत नाही. डॉक्टर अधिकारी कर्मचारी यांच्या ढिसाळ कारभारामुळे सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांचा मृत्यू होतो, त्याचबरोबर युवकांना देखील आपला जीव गमावा लागतो, ही बाब चांगली नाही सर्वसामान्य कुटुंबातील रुग्णांना चांगल्या दर्जाच्या आरोग्यसेवा मिळणे गरजेचे आहे. यासाठी प्रशासनाला उपाययोजना करण्याच्या सूचना यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी दिल्या.

## रमाई आंबेडकर यांची जयंती देरेवाडीत उत्साहात



**अहिल्यानगर :** तथागत बुध्दिस्ट सोसायटी (इंडिया) व नमो बुद्धाय महिला ग्रुपच्या वतीने देरेवाडी (ता. नगर) येथे त्यागमुर्ती रमाई आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. गावातील बुद्ध विहारात विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महिलांना साड्यांचे वितरण करून त्यांचा सन्मान करण्यात आला. महिलांसाठी त्यागाची, संघर्षाची आणि शौर्याची प्रेरणा असलेल्या रमाई आंबेडकर यांच्या योगदानाचा आदर्श ठेवून हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

प्रारंभी रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी देरेवाडी गावचे सरपंच अनिल करांडे, ग्रामपंचायत सदस्य अक्षय भिंगारदिवे, तथागत बुध्दिस्ट सोसायटीचे अध्यक्ष संजय कांबळे, महिला अध्यक्षा आरतीताई बडेकर, सुरेश भिंगारदिवे, विजुभाऊ भिंगारदिवे, यशवंत पाटोळे आदींसह ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

जयंतीच्या निमित्ताने, संजय कांबळे यांनी त्यागमुर्ती रमाई आंबेडकर यांचे जीवनपट आपल्या भाषणातून उलगडले. ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि रमाई यांना एकूण पाच मुलं झाली, पण समाजासाठी चार मुलांचे त्यांनी बलिदान दिले.

## रात्र शाळा ही संकल्पना महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी रुजवली : ॲड. काकडे



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** रात्र शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून, त्यांना विकासाच्या प्रवाहात उभे करण्याचे कार्य भाई सथ्था नाईट हायस्कूल करत आहे. रात्र शाळा ही संकल्पना महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी रुजवली आहे. पुणे येथील भिडे वाड्यात त्यांनी विद्यार्जनाचे कार्य केले. हा वारसा पुढे घेऊन जाण्याचे कार्य ही संस्था करत असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ विधीज्ञ ड. सुभाष काकडे यांनी केले.

हिंद सेवा मंडळ संचलित भाई सथ्था नाईट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे ७३ वे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाच्या उद्घाटनाप्रसंगी अध्यक्षीय भाषणात ड. काकडे बोलत होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी अशोक कडूस, सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक श्रीराम थोरात, सुरेश ढवळे, हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक, माजी अध्यक्ष मधुसूदन मुळे, बालरोगतज्ञ डॉ. रमेश कोठारी, संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस जी कोठारी, नाईट हायस्कूलचे प्राचार्य सुनिल सुसरे, संस्थेचे कार्यकारिणी सदस्य अनंत देसाई, जगदिश झालानी, ज्योती कुलकर्णी, शालेय समिती सदस्य संगीता बट, विलास बडवे, अलकाताई मुळे दादा चौधरी मराठी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष येवले सर, मेहेर इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका अनुरूप झगडे, सिताराम सारडा विद्यालय चे परिवेक्षक गोविंद धर्माधिकारी, नंदे सर, महाजन सर, शिंदे सर आदींसह पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. पारस कोठारी यांनी दिवसा अर्थार्जन करुन रात्री शिक्षणाने विद्यार्थी आपले भवितव्य घडवित आहे. मासूम संस्थेने केलेल्या मूल्यांकनात महाराष्ट्रातील सर्वात मोठी रात्रशाळा म्हणून भाई सथ्था नाईट हायस्कूल असून, नाईट शाळेच्या राज्याच्या प्रथम दहा क्रमांकाच्या गुणवत्ता यादीत इयत्ता दहावी मधील चार विद्यार्थी चमकले आहे. यावर्षी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना वेटिंगवर ठेवावे लागले. सर्वात जास्त २७३ महिला प्रवेशित झाल्या असून, मासूम संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळणारे सहकार्य व शाळेतील सोयी-सुविधेबद्दल त्यांनी माहिती दिली.

प्राचार्य सुनिल सुसरे यांनी रात्र शाळेतील गुणवत्तेचा वार्षिक अहवाल सादर करुन इयत्ता दहावी मध्ये राज्याच्या गुणवत्ता यादीत चमकलेले विद्यार्थी, कला, क्रीडा, शैक्षणिक व विविध स्पर्धा परीक्षेत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आढावा घेतला. पाहुण्यांचा परिचय स्वाती होले यांनी करुन दिला.

अशोक कडूस म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षणाचा प्रवाह बदलत आहे. दहावी, बारावीत किती टक्के गुण पडले? या गुणवत्तेला महत्त्व न राहता मुलांच्या कौशल्यावर त्याची प्रगती ठरणार आहे. अनेक क्षेत्र विद्यार्थ्यांची वाट पाहत असून, विविध संधी निर्माण झाल्या आहेत. शिक्षणाने प्रगल्भता आणण्याचे काम होणार आहे. जीवनात कौशल्य आत्मसात करण्यासाठी शिक्षण असण्याची गरज आहे. केवल अर्थार्जनासाठी शिक्षण नसून समाज परिवर्तनाचे माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले. तर निष्ठेने काम करुन सेवाधर्माने ब्रॅण्ड निर्माण करण्याचे त्यांनी आवाहन केले.

मधुसूदन मुळे यांनी रात्र शाळेतील प्रत्येक विद्यार्थी एक कादंबरी आहे. नाईट स्कूलचे शिक्षक पालकांप्रमाणे विद्यार्थ्यांची काळजी घेऊन त्यांना दिशा देत असल्याचे सांगितले. डॉ. रमेश कोठारी यांनी आयुष्याच्या प्रगतीची सूत्रे सांगितली. शिरीष मोडक यांनी नाईट स्कूलमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सोयी-सुविधांचा फायदा घेऊन शिक्षणासाठी विद्यार्थ्यांनी प्रवाहात येण्याचे आवाहन केले.

कला, क्रीडा, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात यश मिळविणाऱ्या रात्रशाळेतील विद्यार्थ्यांना उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वृषाली साताळकर व अनुराधा दरेकर यांनी केले. आभार शिक्षक प्रतिनिधी बाळासाहेब गोरडे यांनी मानले. यावेळी शिवा शिंदे, कैलास करांडे, अलकाताई मुळे, सुभाष येवले, अनुरिता झगडे, धर्माधिकारी सर, दीपक शिंदे, कांबळे सर, शरद पवार, गजेंद्र गाडगीळ, महादेव राऊत, अमोल कदम, शिवप्रसाद शिंदे, संदेश पिपाडा, मंगेश भुते, अशोक शिंदे, कैलास करांडे, प्रशांत शिंदे, अनिरुद्ध देशमुख, अनिरुद्ध कुलकर्णी, संदीप कुलकर्णी, अविनाश गवळी, मनोज कोंडेजकर, कैलास बालटे, उज्वला साठे, वैशाली दुराफे, स्वाती होले आदींसह शालेय शिक्षक व शिक्षकेतर उपस्थित होते.


### जाहीर लिलाव नोटीस

मिरजगावमधील तमाम नागरिकांना कळविण्यात येते की, ग्रामपंचायत मिरजगाव, ता.कर्जत, जि.अहिल्यानगर यांच्या मालकीच्या जागेतील सर्व्हे नंबर ५६२ मधील चिंच, निंब, सुबाभुळ झाडे तोडण्याचे लिलाव दि.१४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता ग्रामपंयात कार्यालय येथे होणार आहे.

सदर लिलावाबाबत सर्व नियम, अटी ग्रामपंचायत नोटीस बोर्डवर डकविण्यात आली आहे. माहितीस्तव ग्रामपंचायत कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर लिलाव प्रक्रियाबाबतचे सर्व अधिकार सरपंच ग्रामपंचायत, मिरजगाव यांचे राहतील.

**सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत मिरजगाव, ता.कर्जत,जि.अ.नगर**


## द·ख·ल



### डॉ.नेवसे यांचा वाढदिवस साध्या पध्दतीने साजरा

**मिरजगाव :** सदगुरू उद्योग समूहाचे संस्थापक, उद्योजक डॉ. शंकरराव नेवसे यांचा ५५ व्या वाढदिवसानिमित्त विविध ठिकाणी सामाजिक उपक्रम राबवून साध्या पद्धतीने वाढदिवस साजरा करण्यात आला.

नेवसे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त कुठलेही डामडौल व खर्च न करता वाढदिवसाच्या खर्चाला फटा देत वाढदिवस आपल्या मित्र परिवार व कुटुंबियांसमवेत साध्या पद्धतीने केक कापून साजरा केला. नेवसे यांच्या हस्ते संत गजानन महाराज मंदिरात अभिषेक करून मनोभावे पूजा करण्यात आली. आणि श्री संत गजानन महाराज मंदिर कुळधरण रोड, कर्जत येथे अभिषेक व पूजा करून सदगुरू मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट्स तसेच शिवशंकर पेट्रोलियम कर्जत येथे

तसेच सदगुरू उच्च माध्यमिक कन्या विद्यालय कर्जत, मिरजगाव येथील सदगुरू कृषी महाविद्यालय व गजानन महाराज पतसंस्था आदींसह तालुक्यातील इतर संस्थेत वाढदिवस साजरा झाला. या कार्यक्रमास संस्थेच्या अध्यक्षा कल्याणीताई नेवसे, सचिव राजेंद्र गोरे, युवा उद्योजक सिद्धांत नेवसे, उद्योग समूहाचे व्यवस्थापक रवीकिरण थोरात, पाठक सर, एकनाथ हेंबाडे, भगवान शिंदे, सदाबापू शिंदे, पोपट आबा शिंदे, डॉ.श्रीराम धस, संदीप कारंजकर, प्राचार्य डॉ.रामदास बिटे, सुरज जाधव, ज्योती अवसारे, विनोद शिंदे, सुहास मेहेत्रे, अनिल चौरे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, सर्व कर्मचारी वृंद, विद्यार्थी - विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ग्रामसेवक पतसंस्थेच्या संचालकपदी मंडलिक, खेडकर यांची निवड



**अहिल्यानगर :** अहमदनगर जिल्हा ग्रामसेवक सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळातील दोन रिक्त जागांवर सुरेश मंडलिक व नारायण खेडकर यांची एकमताने निवड करण्यात आली. सहकार विभागाचे अधिकारी विक्रम मुटकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत या निवडी करण्यात आल्या. मुटकुळे यांना उमेश देवकर यांनी सहाय्य केले.

यावेळी चेअरमन सतिष मोटे, व्हा.चेअरमन दिलीप नागरगोजे, मानद सचिव शाम भोसले, ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष युवराज पाटील, जिल्हा सरचिटणीस अशोक नरसाळे , जिल्हा कार्याध्यक्ष रविंद्र ताजने , कोषाध्यक्ष सुभाष गर्जे , पतसंस्थेचे संचालक सुनिल नागरे, मंगेश पुंड, वाळीबा मुंढे, रुबाब पटेल, किसन भिंगारदे, उद्धव जाधोर, भगवान खेडकर, रामदास गोरे, संदीप लगड, सुनिल वाघ, सविता भाकरे, राणी फाटके, राज्य कौन्सिलर शहाजी नरसाळे , संपत गोल्हार, संस्थेचे सेक्रेटरी प्रदीप कल्याणकर, नफीसखान पठाण आदींसह संस्था व संघटना प्रेमी पदाधिकारी, सभासद उपस्थित होते. अकोले येथील संचालक एकनाथ ढाकणे सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या जागी अकोले येथीलच सुरेश मंडलिक यांची निवड करण्यात आली. तसेच कोपरगावचे संचालक गोरक्षनाथ शेळके हे सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या जागी नारायण खेडकर यांची निवड करण्यात आली.

### जिल्हा उर्दू साहित्य परिषदेतर्फे उर्दू सप्ताहाचे आयोजन

**अहिल्यानगर :** दरवर्षीप्रमाणे या वर्षीही अहमदनगर जिल्ह्यात उर्दू प्रेमींच्या सहकार्याने उर्दू सप्ताह साजरा केला जाणार आहे. या सप्ताहात सर्व शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षक सक्रियपणे सहभागी होतात.या वर्षीचा तपशील खालील प्रमाणे आहे. सोमवार १० फेब्रुवारी २०२५ रोजी उर्दू सप्ताहाचे उद्घाटन, उर्दू भाषेच्या इतिहासाचे वर्णन. उर्दू भाषेचे महत्त्व आणि इतिहास याबद्दल माहिती प्रदान करणे. मंगळवार ११ फेब्रुवारी रोजी मुलांना पाठ्यपुस्तकातील कविता म्हणणे. बुधवार १२ फेब्रुवारी रोजी उर्दू कॅलिग्राफी स्पर्धा,उर्दू वाचन स्पर्धा. गुरुवार १३ फेब्रुवारी रोजी बैत बाजी आणि कविता वाचन स्पर्धा होईल.

शनिवार १५ फेब्रुवारी रोजी पवित्र ग्रंथ स्तुती आणि पठण स्पर्धा. सोमवार १७ फेब्रुवारी रोजी उर्दू लेखक आणि कवींबद्दल माहिती. त्यांच्या नावांची यादी बनवुन आणि त्यांच्याबद्दल थोडक्यात माहिती लिहणे. मंगळवार १८ फेब्रुवारी रोजी उर्दू गीते, गझल आणि विनोदांचे पठण करने आणि ते लक्षात ठेवणे. गुरुवार २० फेब्रुवारी रोजी समारोप आणि पुरस्कार वितरण समारंभ घेतला जाईल असे अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेचे अध्यक्ष सलीम खान पठाण यांनी सांगितले.

या मेळाव्यात उर्दू आठवड्यात सहभागी होणाऱ्या मुलांचे तसेच या वर्षी ज्या पालकांनी आपल्या मुलांना शाळेत दाखल केले आहे त्यांचे विशेष स्वागत केले जाईल.

उर्दू सप्ताहात दररोज किंवा कोणत्याही एका दिवशी आपापल्या शाळांमधून पदवीधर झालेले आणि उर्दू माध्यमाच्या पलीकडे उच्च शिक्षण घेतलेले माजी विद्यार्थी आणि आज समाजात चांगले पद भूषवणाऱ्या किंवा यशस्वी उद्योजकांना मुलांसमोर आमंत्रित केले जाईल आणि त्यांचे स्वागत केले जाईल.असे सचिव आबीद दुलेखान यांनी सांगितले.

द • ख • ल

# दहिवडीत दोन जणांसह अपंग युवकाला मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**तळेगाव ढमढेरे :** दहिवडी (ता. शिरुर) येथील तुकाराम पिंगळे व ज्ञानेश्वर पिंगळे हे दोघे शेतातून येत असताना शेजारील भैरू पिंगळे हा त्या बापलेकांना शेतातील रस्त्याने जायचे नाही असे म्हणून शिवीगाळ व मारहाण करत होता. यावेळी ज्ञानेश्वर यांचा अपंग असलेला ओम हा मुलगा त्याच्या व्हील चेअरवर बसून सदर घटना स्थळी येत तुम्ही माझ्या वडील व आजोबांना शिव्या देऊ नका अशी विनवणी भैरू पिंगळे यांना करत असताना भैरू यांनी अपंग ओमला देखील शिवीगाळ, दमदाटी करत त्याच्या व्हील चेअरला लाथ मारून ओमला खाली पाडले, याबाबत ओम ज्ञानेश्वर पिंगळे (वय १७ वर्षे रा. दहिवडी ता. शिरुर जि. पुणे) या अल्पवयीन युवकाने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी भैरू शिवाजी पिंगळे (रा. दहिवडी ता. शिरुर जि. पुणे) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार किशोर तेलंग हे करत आहे.

## अनधिकृत बांधकामावर कारवाई, मोठा पोलीस बंदोबस्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**पुणे :** चिखली, कुदळवाडीतील अनधिकृत बांधकामे, पत्राशेड काढून घेण्यासाठी व्यावसायिकांना दिलेली सहा दिवसांची मुदत संपल्यानंतर महापालिका प्रशासनाने शनिवारी पहाटेपासून अनधिकृत बांधकामांवर कारवाई सुरू केली आहे. या भागात पोलिसांचा मोठा बंदोबस्त असून छावणीचे स्वरूप आले आहे. वाढत्या आगीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने चिखली, कुदळवाडी परिसरातील भंगार दुकाने, गोदाम तसेच, हॉटेल, बेकरी, पत्राशेड, वर्कशॉप अशा अनधिकृत असलेल्या पाच हजार अनधिकृत व्यावसायिक आस्थापनांना नोटिसा दिल्या होत्या. १५ दिवसांची मुदत संपल्यानंतर अनधिकृत गोदामे, पत्राशेड, बांधकामे हटवण्यासाठी ३० जानेवारी रोजी महापालिकेचे पथक गेले होते मात्र, या कारवाईला विरोध झाला होता.

## श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीला सूर्यकिरणांचा अभिषेक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**पुणे :** कोवळ्या उन्हाच्या सूर्यकिरणांनी शनिवारी सकाळी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीला चक्क महाभिषेक केला. सूर्यकिरणे गणरायाच्या मूर्तीवर पडली आणि 'जय गणेश'चा जयघोष करत भाविकांनी हा सुखसोहळा आपल्या मोबाईलमध्ये टिपला. माघ गणेश जन्माच्या उत्सवानंतर उत्तरायणामध्ये ही सूर्यकिरणे 'श्रीं'च्या मूर्तीवर पडतात.श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात शनिवारी सकाळी भाविकांनी हा सोहळा अनुभविला. सकाळी सव्वाआठ ते ८ वाजून ३१ मिनिटांपर्यंत हा किरणोत्सव उपस्थितांना पाहता आला. गणरायाच्या उत्सवमूर्तीसमोर असलेल्या चांदीच्या मूर्तीवर सूर्यकिरणे पडली होती. त्यासोबतच देवी सिद्धी व देवी बुद्धी यांच्या चांदीच्या मूर्तींनाही सूर्यकिरणांनी स्पर्श केला

## दुचाकी चोरणारा गजाआड ११ दुचाकी जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**शिरुर :** तालुक्यासह जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातून दुचाकी चोरणाऱ्या चोरट्याला शिरुर पोलीस आणि ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने अटक केली. त्याच्याकडून ११ दुचाकी जप्त करण्यात आल्या. संतोष उर्फ शरद गजानन इंगोले (वय २९, रा. पांगारी कुटे, ता. मालेगाव, जि. वाशिम) असे अटक करण्यात आलेल्या चोरट्याचे नाव आहे. त्याला पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयने दिली, अशी माहिती पुणे ग्रामीण पोलीस दलातील अतिरिक्त पोलीस अधीक्षक रमेश चोपडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. शिरूर परिसरात गेल्या काही महिन्यापासून दुचाकी चोरीला जाण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. शिरुर पोलीस ठाण्याच्या तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, पोलीस कर्मचारी नीरज पिसाळ, विजय शिंदे आणि पथकाने तपास सुरू केला. तांत्रिक तपासात इंगोलेने दुचाकी चोरीचे गुन्हे केल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्याला वाशिम जिल्ह्यातील पांगारी कुटे गावातून इंगोलेला ताब्यात घेतले. प्राथमिक तपासात इंगोले याने पुणे जिल्ह्यातील शिरूर, चाकण, भोसरी एमआयडीसी, लोणीकंद, खडकी, आळंदी, म्हाळुंगे, दिघी, तसेच बुलढाणा जिल्ह्यातील धाड या पोलीस ठाण्यांच्या परिसरातून दुचाकी चोरल्याचे उघडकीस आले. इंगांले सराइत चोरटा आहे. त्याच्या घराच्या परिसरातून पोलिसांनी ११ दुचाकी जप्त केल्या आहेत. त्याच्याविरुद्ध यापूर्वी वाशिममधील जळुका, मालेगाव, अकोला जिल्ह्यातील पातुर , बुलढाणा जिल्ह्यातील मेहेकर, लोणार, तसेच जळगावमधील जामनेर पोलीस ठाण्यात वाहनचोरीचे गुन्हे दाखल आहेत. बनावट चावीने दुचाकी चोरून तो ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना स्वस्तात दुचाकींची विक्री करायचा, अशी माहिती अतिरिक्त पोलीस अधीक्षक रमेश चोपडे यांनी दिली.

# राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेचा पुनित बालन संघ विजेता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**बारामती:** कारभारी आण्णा चॅरिटेबल फाउंडेशन बारामती यांच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. बाबासाहेब स्टेडियम बारामती येथे कारभारी प्रिमिअर लिग २०२५ ही राज्यस्तरीय लेदर बॉल टी-२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या मध्ये पुनीत बालन संघ अंतिम विजेता ठरला आहे. शनिवार ( एक फेब्रुवारी ) रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री पवार, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, अर्जुन पुरस्कार व पॅरिस ऑलम्पीक मध्ये पन्नास मीटर रायफल शुटींग या खेळामध्ये ब्राँझ पदक विजेता स्वप्नील कुसळे, तसेच प्रसिध्द माजी भारतीय क्रिकेटपटू केदार जाधव यांनी कारभारी प्रिमीयर लीग- २०२५ ला सेमिफायनलच्या दिवशी सदिच्छा भेट दिली होती व सामन्याचे नाणेफेक करून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या होत्या. सदर प्रसंगी पूण्याचे पालक मंत्री अजित पवार यांनी बारामतीच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडियमवर भविष्यात अंतरराष्ट्रीय पातळीचे सामने होण्याच्या दृष्टीने माजी भारतीय क्रिकेटपटू केदार जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सराव व सामन्यांसाठी खेळपट्ट्या तयार करणे, स्टेडियमचे नुतणीकरण करणे, नवीन पॅव्हेलियन बांधणे, डे-नाईट सामन्यांकरिता फ्लड लाईटस् बसविणेबाबतच्या सुचना सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार व बारामती नगरपालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांना देऊन सदर बाबतचा आराखडा लवकरात लवकर सादर करण्याचे आदेश दिले व आवश्यक निधी उपलब्ध करून देणार असल्याचे सांगितले होते.

# उच्चशिक्षित आईने पोटच्या दोन चिमुकल्यांचा गळा आवळला




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**दौंड :** उच्च शिक्षित आईने अडीच वर्षांची मुलगी आणि सव्वा वर्षांच्या मुलाचा ओढणीने गळा आवळून हत्या केली. कौटुंबिक वादातून तिने टोकाचे पाऊल उचलले. ही घटना उघडकीस आल्यानंतर स्वामी चिंचोली परिसरात शोककळा पसरली. घरगुतीवादातून आईने अडीच वर्षांची मुलगी आणि सव्वा वर्षांच्या मुलाची ओढणीने गळा आवळून हत्या केल्याची धक्कादायक घटना दौंड तालुक्यातील स्वामी चिंचोली गावात शनिवारी घडली. दोन मुलांची हत्या करुन महिलेने गाढ झोपेत असलेल्या पतीवर कोयत्याने वार करुन त्याचा खुनाचा प्रयत्न केला. आईनेच दोन मुलांची हत्या केल्याची घटना उघडकीस आल्यानंतर स्वामी चिंचोली गाव परिसरात शोककळा पसरली. याप्रकरणी आईला दौंड पोलिसांनी अटक केली. पियू दुर्योधन मिंढे (वय अडीच), शंभू दुर्योधन मिंढे (वय सव्वा वर्ष) अशी या दुर्देवी घटनेत मृत्युमुखी पडलेल्या मुलांची नावे आहेत. याप्रकरणी कोमल दुर्योधन मिंढे (वय ३०) हिला अटक करण्यात आली आहे. तिने गाढ झोपेत असलेले पती दुर्योधन आबासाहेब मिंढे (वय ३६) यांच्यावर कोयत्याने वार केले. तिने केलेल्या हल्ल्यात दुर्योधन जखमी झाले असून, त्यांच्यावर बारामतीतील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत, अशी माहिती दौंड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांनी दिली. दुर्योधन मिंढे एका माहिती-तंत्रज्ञान कंपनीत संगणक अभियंता आहेत. सध्या ते घरातून काम करतात. त्यांची पत्नी कोमल उच्च शिक्षित आहे. मिंढे कुटुंबीय स्वामी चिंचोली गावातील शिंदे वस्ती भागात राहायला आहेत. शनिवारी पहाटे साडेपाचच्या सुमारास कोमलने ओढणीने पियू आणि शंभू यांचा गळा आवळून खून केला. त्यानंतर गाढ झोपेत असलेल्या दुर्योधन यांच्यावर कोयत्याने वार करण्यास सुरुवात केली. दुर्योधन यांनी आरडाओरडा करण्यास सुरुवात केली. दुर्योधन यांचे आई-वडील, भाऊ झोपेतून जागे झाले. जखमी अवस्थेतील दुर्योधन यांना तातडीने बारामतीतील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती मिळताच दौंडचे उपविभागीय अधिकारी बापूसाहेब दडस, पोलीस निरीक्षक गोपाळ पवार, सहायक निरीक्षक नागनाथ पाटील, उपनिरीक्षक दत्तात्रय कुंभार, सहायक फौजदार गोरख मलगुंडे यांनी घटनास्थळी धाव घेतली.

# सणसवाडीत चाकूच्या धाकाने युवतीचा मोबाईल चोरणारे जेरबंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**तळेगाव ढमढेरे :** सणसवाडी (ता. शिरुर) येथील हॉटेल भाऊचा धक्का जवळ रात्रीच्या सुमारास उभ्या असलेल्या युवतीला चाकूचा धाक दाखवून मोबाईल हिसकावून सुमारास तिच्या वडिलांना डबा देण्यासाठी चाललेली असताना दुचाकीहून आलेल्या तिघा अज्ञातांनी पायलला चाकूचा धाक दाखवून तिच्या हातातील मोबाईल हिसकावून पळून गेले, याबाबत पायल

**चोरीसाठी चोरीच्या दुचाकीचा वापर**

**सणसवाडी येथे चाकूच्या धाकाने युवतीचा मोबाईल हिसकावणाऱ्या आरोपींना पोलिसांनी अटक केल्यानंतर त्यांनी गुन्ह्यात वापरलेली दुचाकी हि खराडी पोलीस स्टेशन हद्दीतून चोरी केल्याचे समोर आल्याने आरोपी चोरीसाठी चोरीच्या दुचाकीचा वापर करत असल्याचे उघड झाले आहे.**

चोरी करणाऱ्या युवकांना स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने जेरबंद केले असून गणेश कैलास भोसले व अजय माणिक घेगडे असे पोलिसांनी जेरबंद केलेल्या युवकांची नावे आहे. सणसवाडी (ता. शिरुर) येथील हॉटेल भाऊचा धक्का जवळून पायल लोहार हि युवती रात्रीच्या संतोष लोहार (वय १९ वर्षे रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. पाडळोशी ता. पाटण जि. सातारा) हिने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी तीन अज्ञात युवकांवर गुन्हा दाखल केला तर सदर गुन्ह्याचा तपास करत असताना गुन्ह्यातील आरोपी श्रीगोंदा तालुक्यातील असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस हवालदार तुषार पंदारे, जनार्दन शेळके, संजय जाधव, राजू मोमीन, मंगेश थिगळे, सागर धुमाळ यांनी श्रीगोंदा येथे जात गणेश भोसले यास ताब्यात घेतले असता त्याने अजय घेगडे व त्यांच्या एका साथीदाराच्या मदतीने सदर गुन्हा केल्याचे कबुल केले,

त्यावेळी पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त करत गणेश कैलास भोसले (वय १८ वर्षे रा. मावळेवाडी ता. पारनेर जि. अहिल्यानगर) व अजय माणिक घेगडे (वय १९ वर्षे रा. राजापूर ता. श्रीगोंदा जि, अहिल्यानगर) या दोघांना अटक केली तर त्यांचा एक साथीदार फरार झाल्याने त्याचा शोध पोलीस घेत असून पुढील तपास पोलीस हवालदार रवीकिरण जाधव हे करत आहे.

# पोलीस पाटील वंदना साबळे उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मानित




करंदी (ता. शिरुर) गावच्या पोलीस पाटील वंदना साबेल यांना सन्मानित करताना उपस्थित मान्यवर.(छायाचित्र आकाश भोरडे)

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**तळेगाव ढमढेरे :** करंदी (ता. शिरुर) गावच्या पोलीस पाटील वंदना महेश साबळे यांना नुकतेच पोलीस पाटील पदाच्या माध्यमातून सुरु असलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्याचे अप्पर पोलीस महासंचालक कृष्ण प्रकाश यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे. करंदी (ता. शिरुर) गावच्या पोलीस पाटील वंदना महेश साबळे यांनी गावामध्ये सामाजिक सलोखा राखत समाज हिताचे विविध उपक्रम राबवले आहे, तर गावामध्ये शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस आणि जनता समन्वयात महत्वाची भूमिका बजावली असून पोलीस पाटील वंदना साबळे यांच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत त्यांना पुणे जिल्हा पोलीस पाटील मेळाव्यामध्ये राज्याचे अप्पर पोलीस महासंचालक कृष्ण प्रकाश यांच्या हस्ते विशेष प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले, यावेळी पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधिक्षक रमेश चोपडे, गणेश बिरादार, बाळासाहेब शिंदे पाटील यांसह आदी उपस्थित होते, तर या सन्मानाबाबत बोलताना सदर सन्मान माझा नसून करंदी ग्रामस्थांचा असल्याची भावना पोलीस पाटील वंदना साबळे यांनी व्यक्त केली, दरम्यान वढू बुद्रुकचे पोलीस पाटील जयसिंग भंडारे व कोरेगाव भीमाच्या पोलीस पाटील मालन गव्हाणे यांना देखील उपस्थित पोलीस अधिकाऱ्यांच्या हस्ते उत्कृष्ट कामगिरीबद्दल सन्मानित करण्यात आले आहे.

# जारकरवाडी येथे डाळिंबाच्या बागेला कपड्याचे आच्छादन



जारकरवाडी ( ता. आंबेगाव) येथे डाळींबाचा बागेला वापरण्यात आलेले कपड्याचे आच्छादन ( छायाचित्र राजु देवडे )

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**लोणी धामणी** तीव्र उन्हापासून संरक्षण होण्यासाठी जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील डाळींब उत्पादक शेतकरी संतोष सावकार भोजने या शेतकऱ्यांने डाळिंब बागेचे संरक्षण करण्यासाठी पांढऱ्या कापडाचे (क्रॉप कव्हर) आच्छादन घातले आहे. यामुळे बाग पांढऱ्या शुभ्र दिसत आहेत. सध्याच्या वाढत्या तापमानामुळे फळबागांवर टांगती तलवार आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले असून फळबागांचे संरक्षण कारण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करत आहेत. पुणे जिल्ह्यातील डाळींब उत्पादक शेतकऱ्यांनी आच्छादन टाकण्यास सुरवात केली आहे. या आच्छादनाने तरी फळबागांना सुरक्षितता मिळण्यास मदत होईल, अशी आशा येथील शेतकऱ्यांना आहे. वाढत्या उन्हाच्या तीव्र उष्णतेमुळे डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांसह इतर फळ बागायतदार शेतकरी मोठ्या संकटात सापडले असून फळबागा वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची मोठी धावपळ सुरू झाली आहे. आंबेगाव तालुक्यात घोडनदी, डिंभे धरणाचा उजवा कालवा, डावा कालवा या माध्यमातून शेतकऱ्यांना शाश्वत पाणी उपलब्ध होत असल्याने या भागातील शेतकरी ऊस, कांदा या पिकांबरोबर फळबागांचे उत्पादन घेऊ लागला आहे. भोजने यांनी साधारण आठ वर्षांपूर्वी दोन एकर क्षेत्रात डाळिंबाची लागवड केली आहे. वाढत्या उन्हापासून डाळिंबाची बाग संरक्षित करण्यासाठी आणि बदलत्या वातावरणाचा परिणाम होऊ नये म्हणून भोजने यांनी दोन एकर डाळिंब बागेला आच्छादन लावून बाग जगविण्यासाठी प्रयत्न करत आहेत. यामुळे वाढत्या उन्हापासून डाळिंबाचे फळ वाचण्यास मदत होणार आहे. तसेच बाग वाचविण्यासाठी सुधारित पद्धतीच्या आच्छादनाचा वापर करता येत असल्याचे डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांतून बोलले जात आहे. डाळिंब उत्पादक शेतकरी तुकाराम भोसले म्हणाले की, डाळिंब बागांचे वाढत्या उन्हापासून संरक्षण करण्यासाठी शेतकरी पांढऱ्या कपडाचे ( क्रॉप कव्हर ) गरजेनुसार जुन्या साड्या, कापड याचा वापर करतात. परंतु वादळी वारा, किंवा इतर नैसर्गिक संकटामुळे कापड फाटून जाते. अनेक डाळींब उत्पादक शेतकरी नेटचा वापर करुन डाळिंब बागेला अच्छादन देऊन फळबागा वाचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. यासाठी मोठा खर्च येत आहे शेतकरी वर्ग आपले पीक वाचविण्यासाठी अतोनात प्रयत्न करत असतो मात्र त्याला शासनाने साथ देणे गरजेचे आहे.

# मालमत्तेच्या वादातून काकाचा खून पुतण्यासह तिघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**पुणे :** मालमत्तेच्या वादातून पुतण्याने काकावर तीक्ष्ण शस्त्राने वार करुन खून केल्याची घटना पाषाण गावातील कोकाटे आळीत शनिवारी सकाळी घडली. याप्रकरणी पुतण्यासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महेश जयसिंगराव तुपे (वय ५६, रा. विठ्ठल मंदिराजवळ, पाषाण गाव) असे खून झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी शुभम महेंद्र तुपे (वय २८), रोहन सूर्यवंशी (वय २०), ओम बाळासाहेब निम्हण (वय २०, तिघे रा. पाषाण गाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत महेश तुपे यांचा मुलगा वरद (वय १९) याने चतु:शृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी शुभम हा महेश तुपे यांचा पुतण्या आहे. त्यांच्या मालमत्तेवरुन वाद सुरू होता. महेश आणि शुभमची आई यांचे एकत्र बँक खाते आहे. एकत्र बँक खात्यातील पैशांची मागणी शुभमने काका महेश यांच्याकडे केली होती. या कारणावरुन त्यांच्यात वाद झाला होता. शुभमने मित्र रोहन, ओम यांना हाताशी धरुन काका महेश यांचा खून करण्याचा कट रचला. शनिवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास महेश पाषाण गावातील कोकाटे आळीतून दूध आणण्यासाठी निघाले होते. आरोपी शुभम, रोहन आणि ओम कोकाटे आळीतील गणपती मंदिराजवळ दबा धरून बसले होते. आरोपींनी त्यांच्यावर तीक्ष्ण शस्त्राने वार केले. गंभीर जखमी झालेल्या महेश यांना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# निरगुडसर शाळेत भरला बालआनंद मेळावा

## दिड लाखांची उलाढाल



निरगुडसर -ता-आंबेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भरलेला बाल आनंद मेळावा प्रसंगी उपस्थित ग्रामस्थ,पालक वर्ग व विद्यार्थी .

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**निरगुडसर :** विद्यार्थ्यांना व्यवहारज्ञानाची माहिती होऊन बुध्दिमत्ता वाढावी, तसेच गणित विषयाची आवड निर्माण व्हावी व आकडेवारी कळावी, या उद्देशाने निरगुडसर (ता. आंबेगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 'बाल आनंद मेळावा' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या मेळाव्यात सहभागी विद्यार्थ्यांनी विक्रीसाठी लावलेल्या विवीध ६५ स्टॉल मधून सुमारे १ लाख पन्नास हजार रुपयांची उलाढाल झाली असल्याची माहिती मुख्याध्यापिका संगिता शेटे यांनी दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी बटाटा, कांदे, मेथीची भाजी, कोथिंबीर ,कोबी फ्लॉवर, भोपळा, शेपु, अशी विविध प्रकारचा भाजीपाला विक्री साठी आणला होता तर खाऊ गल्लीत भेळ, लाडू, जिलेबी, पाणी पुरी, मसाला डोसा, इडली, अप्पे, पाव भाजी, पुलाव, नाचणी सुप, चायनीज पदार्थ विक्री साठी आणले होते. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिकणारा विद्यार्थी हा संपूर्ण ग्रामीण भागातील असुन बहुतांशी मुले हि सर्व सामान्य कुटुंबातील आहेत. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील मनावरील असलेला अभ्यासक्रमाचा मानसिक ताण दूर करुन विरंगुळा मिळावा व त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने दरवर्षी आनंद मेळाव्याचे आयोजन केले जाते असे सह शिक्षक नारायण गोरे यांनी सांगितले. या मेळाव्यासाठी मंदाताई वळसे पाटील, विघ्नहर कारखान्याचे संचालक नामदेव थोरात, सरपंच रवींद्र वळसे पाटील, मा.उपसरपंच आनंदराव वळसे पाटील, पोलिस पाटील विठ्ठल वळसे पाटील, प्राचार्य कांताराम टाव्हरे, केंद्र प्रमुख कांताराम भोंडवे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा सुवर्णा शिंदे , उपाध्यक्ष बाबाजी मेंगडे, चेअरमन सुरेश टाव्हरे, रामदास थोरात, डॉ.सुरेश टाव्हरे, अतुल साबळे, रामदास टाव्हरे, संतोष टाव्हरे, सुनंदा गोरे, जयश्री थोरात, सारीका कडवे, शिल्पा राऊत,या मान्यवर मंडळींनी तसेच पंडित नेहरू विद्यालयाचे विद्यार्थी ग्रामस्थ व पालकांनी भेटी देऊन या उपक्रमाचे कौतुक केले. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका संगिता शेटे, शिक्षक नारायण गोरे, सुभाष इंदोरे, वैशाली वळसे, प्रतिभा वाकचौरे, संगिता इंदोरे, मनिषा हिंगे, शालेय व्यवस्थापन समिती यांनी प्रयत्न केले.

# पिकअप व कारच्या धडकेत १९ जखमी, जखमींमध्ये शाळकरी मुलांचा समावेश





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**आळेफाटा :** ओतुर (ता.जुन्नर) पोलीस स्टेशन हद्दीतील धोलवड फाट्या नजीक पीकअप टेम्पो व कार च्या समोरासमोर झालेल्या भीषण धडकेत एकूण १९ जन जखमी झाले असल्याची माहिती ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे यांनी दिली. सदर अपघात दि.०७ रोजी सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास ओतुर, ओझर ते नारायणगावकडे जाणारे रोडवर धोलवड फाटा येथे ओतुर बाजुकडुन नारायणगाव बाजुकडे जाणारी पिकअप टेम्पो( एम एच १४ जी यु १५६६ ) व नारायणगाव बाजुकडुन ओतुर बाजुकडे येणारी फियाट लिना कार ( एम एच १२ जी एफ ०८६०) यांची समोरासमोर धडक होवुन अपघात झाला असुन अपघातील पिकअप मध्ये जिल्हा परिषद प्रथमिक शाळा आळु ता. जुन्नर, जि. पुणे या शाळेतील विध्यार्थी व पालक हे खोडद ता. जुन्नर. जि. पुणे येथे शालेय शैक्षणिक साहित्य वाटपाचे कार्यक्रमानिमित्त जात असताना हा दुर्दैवी अपघात घडला. या अपघातात अरविंद बबनराव हांडे( वय ५५ ) चालक - रा. पिंपळगाव जोगा ता जुन्नर जि पुणे. ईश्वरी मोहन बोकड (वय ८), यश पंडित घाडगे (वय ७ ) ,सार्थक प्रकाश साळवे (वय ८ ), ऋषी राजेंद्र भले( वय ८), कुणाल भगवान लोहकरे (वय ७ ), सर्वेश पोपट बोकड (वय ७), श्रेया भाविक धोत्रे (वय ८), शिवांश सुधिर सस्ते (वय ८) ,आदित्य संपत तळपे( वय ९), मीना भगवान लोकरे( वय २३), प्रकाश कचरू साळवे (वय ३९ ), विठ्ठल रखमा गाडगे( वय ७०), कल्पना भिमराव धोत्रे (वय ५०) सर्व रा आळू ता जुन्नर जि पुणे. सुधीर जगन सस्ते (वय ४२ ) रा पिंपळगाव जोगा ता जुन्नर जि पुणे. हे सर्वजण जखमी झाले. तसेच कार मधील हर्ष दिनेश शहा (वय २४) रा आदिनाथ सोसायटी, पुणे ता हवेली जि पुणे (चालक), ऋग्वेद युवराज पुसदकर( वय २२ ) रा पुणे. हिमांशू किशोर पांडे रा. नऱ्हे पुणे, सुरज संतोष मोरे (वय २६ ) रा धनकवडी पुणे प्रतीक दुनगुले पूर्ण नाव माहित नाही रा पुणे. असे एकूण १९ जण जखमी झाल्याने विविध खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. अपघाताची माहिती मिळताच ओतूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लहू थाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवलदार सुरेश गेंगजे, शामसुंदर जायभाये, संदीप भोते, किशोर बर्डे, माधुरी खोसे, शुभम काशीद हे तातडीने हजर झाले होते. या अपघाताचा पुढील तपास ओतूर पोलीस करीत आहेत.

# जळोची येथे माता रमाई आंबेडकर जयंती उत्साहात



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री
**बारामती :** जळोची रमाईनगर येथे माता रमाई आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन बुद्धवंदना घेऊन अभिवादन करण्यात आले.या प्रसगी सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल कांबळे यांनी माता रमाई या त्यागाचे प्रतीक आहेत,त्यांच्या जीवनातून प्रत्यकाने प्रेरणा घेणे आवश्यक आहे असे मनोगत व्यक्त करताना सांगीतले. यावेळी माजी नगरसेवक शैलेश बगाडे व संतोष सवाणे यांच्या हस्ते रमाईनगर नामफलकाचे अनावरण करण्यात आले.सदर कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल कांबळे,माजी नगरसेक शैलेश बगाडे, संतोष सवाणे रमाईनगर येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन रमाईनगर येथील सुर्यकांत देवकाते,रमेश सरोज,नंदलाल सरोज,नामदेव जगताप, बाळु चव्हाण, संतोष सरोदे, तुकाराम टेंगल, बादशहाभाई शेख, किशोर मदने,बाबु भोसले, दिपक शिंदे यांच्या वतीने करण्यात आले होते.

द • ख • ल

## अहिल्यानगर- बीड रेल्वेमार्गाची चाचणी यशस्वी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** - अहिल्यानगर- बीड- परळी रेल्वेमार्गावरील विघनवाडी ते बीड अंतरावरील रेल्वे चाचणी यशस्वी झाली. या मार्गावर ताशी १३० किमी वेगाने रेल्वे यशस्वीपणे बुधवारी धावली. अहिल्यानगर ते बीडपर्यंत मार्गाचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे मराठवाड्यातील प्रवाशांची प्रतीक्षा आता संपली आहे. अहिल्यानगर ते बीडपर्यंत रेल्वेमार्गाचे काम पूर्ण झाले आहे. सात वर्षांपासून हे काम सुरू आहे. यापूर्वी अहिल्यानगर ते नारायणडोह, नारायणडोह ते सोलापूरवाडी, सोलापूरवाडी ते आष्टी, आष्टी ते अंमळनेर, अंमळनेर ते विघनवाडी या मार्गाची चाचणी घेण्यात आली. बुधवारी ३० किलोमीटरची रेल्वेमार्गाची यशस्वीरित्या चाचणी घेण्यात आली. या मार्गावर डिझेल इंजिनचा वापर करण्यात आला आहे. आता एकूण १६५ किलोमीटर अंतराची चाचणी पूर्ण करण्यात आली आहे. मार्गावर अनेक मोठे पूल बांधण्यात आले. त्यासाठी मोठे तांत्रिक कौशल्य वापरून दक्षिण रेल्वेवरील सर्वात मोठा गल्डर टाकून रेल्वे रूळ अंथरण्यात आले आहेत. तीनशे मीटर लांबीचे व १८ मीटर उंचीचे मोठे पूल बांधण्यात आले आहेत.

## पोलीस अधीक्षकांकडून पोलीस निरीक्षकांची झाडाझडती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा ;-** श्रीगोंद्यात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तालुका सेवा समिती व श्रीगोंदा वकील संघ याच्या संयुक्त विद्यमाने शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा व प्रत्यक्ष लाभ वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाला पोलीस अधीक्षक राकेश ओला हे पण आले होते त्यांनी नंतर श्रीगोंदा पोलीस ठाण्याला अचानक भेट दिली त्यावेळी स्वच्छतेच्या मुद्द्यावरून पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांची चांगलीच झाडाझडती घेत त्याच्या कामकाजावर पोलीस अधीक्षक यांनी नाराजी व्यक्त केली आहे. सरकारी कार्यक्रम आटपल्यावर पोलीस अधीक्षक यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्याला भेट दिल्यावर पोलीस ठाणे अंतर्गत वर्षभरात किती गुन्हे दाखल झाले किती गुन्हे उघडकीस आले पोलीस ठाण्याचे कामकाज अद्यावत आहे का हद्दीमध्ये गुन्हेगारी रोखण्यासाठी कोणत्या मोहीम राबविल्या पोलीस ठाणे परिसर स्वच्छता यासह अन्य कामांची माहिती घेत अहिल्यानगर पोलीस निरीक्षक राकेश ओला यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या सर्वच कर्मचाऱ्यांची झाडाझडती घेतल्याचे दिसून आले अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी शहरातील श्रीगोंदा पोलीस ठाण्याला भेट देऊन पाहणी केली आणि अधिकाऱ्याची चांगलीच कां उघडणी केली आहे त्यावेळी अहिल्यानगर पोलीस अधीक्षक यांनी वर्षभरातील कामकाजाचा ओझरचा आढावा घेतला त्याचबरोबर वाहतूक समस्या दाखल गुन्हे निर्गती प्रलंबित गुन्हे सामाजिक उपक्रम यासह रोजकीर्द नोंदवही महत्त्वाची कागदपत्रे बँक पासबुक शिल्लक रकमेची रोज किर्द ताळमेळ दरमहा शिल्लक रकमेचा आढावा घेतला चलनाने जमा करण्यात आलेल्या महसुली जमेची पडताळणी सर्व प्रकारचे दंड वसुली आदी प्रशासकीय कामकाजाची माहिती घेतली त्यावेळी काही अधिकार्यांची कामकाजामध्ये प्रगती दिसून येत नसल्याने त्यांची थेट कान उघडली केली.

## शहरटाकळी विद्यालयाचे ५ विद्यार्थी सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र

**शहरटाकळी:** शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी विद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५, राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक (एनएमएमएस) परीक्षेत गवळी ते संपादन केले आहे. राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक (एनएमएमएस) परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे.या परीक्षेमध्ये शहरटाकळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे एकूण दहा विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यापैकी पाच मराठा,कुणबी विद्यार्थ्यांना सारथी शिष्यवृत्ती चा लाभ मिळणार आहे. इयत्ता नववी ते बारावी या कालावधीमध्ये त्यांना वार्षिक १०हजार रुपये मिळणार आहेत.यामध्येकु.पवार श्रेया नारायण ८६गुण,आवारे नैतिक लक्ष्मण ८१गुण,कु.गुळमकर श्रेया विनोद ७९ गुण,चि.शेटे आदित्य लहू ७८गुण,चि.गवळी करण हरिश्चंद्र ७६गुण,चि.रोकडे ओम दत्तात्रय ७६,चि.भालेराव सुशांत दत्तात्रय ७५ गुण,कु.गिरम समृद्धी सचिन ७५ गुण,कु.वाघमारे प्राप्ती शांतवन ७१गुण,चि.कोल्हे तुषार कारभारी ६८ गुणांसह या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. या विद्यार्थ्यांना मोहिनी बडदे,पल्लवी ढोले,अनिता दारकुंडे,अशोक भालेराव,दत्ता सोनसळे,सोनाली सुसे यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. या गुणवंत विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ॲड.डॉ. विद्याधरजी काकडे साहेब, जि.प.सदस्या सौ.हर्षदाताई काकडे, विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे,संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.लक्ष्मण बिटाळ,माध्यमिक विभाग प्रमुख वंदना पुजारी,सहप्रमुख अशोक आहेर,विद्यालयाचे प्राचार्य कांतेश्वर ढोले,पर्यवेक्षिका अंजली चिंतामण,संस्था प्रतिनिधी अनिल मगर व सर्व शिक्षक बंधू भगिनींनी अभिनंदन केले आहे.



# निर्लेखन न करता पवळदरा शाळेची वर्गखोली जमीनदोस्त करण्याचा प्रयत्न

## शिक्षण विभागात सावळा गोंधळ , ग्रामस्थांकडून कारवाईची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर:** तालुक्यातील पोखरी येथील पवळदरा वस्तीवर असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील एका वर्ग खोलीचे निर्लेखन न करता अज्ञात व्यक्तींनी जमीनदोस्त करण्यात प्रयत्न केला आहे. या प्रकारामुळे पारनेर शिक्षण विभागात सावळा गोंधळ असल्याचे दिसून येत आहे. याविषयी सविस्तर माहिती अशी की, पवळदरा वस्तीवर पहिली ते चौथीपर्यंत प्राथमिक शाळा असून या शाळेतील एका वर्ग खोलीचे अज्ञात व्यक्तींनी रविवारी सायंकाळच्या सुमारामध्ये शाळा खोलीचे पत्रे व पाईप काढून घेऊन शाळावर्ग जमीनदोस्त करण्याचा हा प्रकार सोमवारी सकाळी नागरिकांच्या लक्षात येतात त्यांनी पारनेर येथील शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना झालेल्या प्रकाराविषयी भ्रमणध्वनी वरून संपर्क केला.यानंतर शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी पवळदरा शाळेला भेट देऊन माहिती घेण्याचा प्रयत्न केला. या वर्ग खोलीचे निर्लेखन न करता शिक्षण विभागाला कुठल्याही प्रकारे माहिती न देता एक वर्ग खोलीचे पत्रे पाईप काढले आहे. झालेल्या प्रकाराविषयी शिक्षक विभागाने या विषयी सविस्तर माहिती घेऊन ज्या व्यक्तींनी हे कृत्य केले आहे यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केलेली आहे. या शाळेसाठी दोन वर्ग खोल्या आहेत मात्र आता एका वर्ग खोलीचे पत्रे , पाईप काढून घेतल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची आबाळ होऊ नये यासाठी वस्तीवरील मंदिर, समाजमंदिर किंवा खासगी ठिकाणी त्यांची बसण्याची व्यवस्था करावी लागणार आहे.

**पत्रे, पाईप गेले होते चोरीला...!**

**वर्ग खोलीचे पत्रे व पाईप अज्ञात व्यक्तींनी रविवारी सायंकाळी काढून ते सामान अज्ञात स्थळी ठेवण्यात आले होते मात्र सोमवारी सकाळी शिक्षण विभागाचे अधिकारी येणार असल्याची परिसरात चर्चा रंगताच झाल्यानंतर रात्री मधूनच शाळा परिसरामध्ये पत्रे व पाईप हे सामान दिसून आले. हा प्रकार खोडसाळपणा की चोरीच्या उद्देशाने केला असा प्रश्न नागरिकांना पडला असून शिक्षण विभाग काय कारवाई करणार याकडे लक्ष नागरिकांचे लक्ष लागून आहे.**



# अवर सचिव अशोक चेमटे उत्तम कार्यकर्ता पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या ३९ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव तथा शेवगाव तालुक्याचे सुपुत्र अशोक महादेव चेमटे ( मूळ राहणार शिंगोरी , ता. शेवगाव ) यांना उत्तम कार्यकर्ता पुरस्काराने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यालयीन कामकाज उत्तम प्रकारे सांभाळून उल्लेखनिय संघटनात्मक कार्यासाठी चेमटे यांना सन्मानचिन्ह देऊन अधिकारी महासंघ कल्याण केंद्र मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.यावेळी महासंघाचे संस्थापक व मुख्य सल्लागार ग. दि. कुलथे, अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर कोषाध्यक्ष नितीन काळे दुर्गा महिला अध्यक्षा सिद्धी संकपाळ उपस्थित होते. ` यांनी अनेक वर्षे वरिष्ठ मंत्रीमहोदय यांचे विशेष कार्य अधिकारी म्हणून काम पाहिले आहे.चेमटे यांचे मुळगाव शेवगाव तालुक्यातील शिंगोरी असून त्यांचे शालेय शिक्षण श्रीराम विद्यालय ढोरजळगाव येथे झाले आहे.




## श्री ढोकेश्वर महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम

**पारनेर :** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे श्री ढोकेश्वर महाविद्यालयातील एनसीसी विभागातील विद्यार्थीनी राऊत वृषाली,उंडे सुचिता, गायकवाड आचल यांची मुंबई पोलीस दलामध्ये निवड झाली आहे. राऊत वृषाली ही एनसीसी सी सर्टिफिकेट पास असून गायकवाड आचल व उंडे सुचिता या अनुक्रमे एनसीसी मधील द्वितीय व तृतीय वर्षांमध्ये आहेत. पोलीस दलामध्ये सहभागी होण्याची जिद्द व कष्ट घेण्याची प्रवृत्ती यामुळे या विद्यार्थिनींची मुंबई पोलीस दलामध्ये निवड झाली आहे. श्री ढोकेश्वर महाविद्यालयातील एनसीसी युनिट मधील विद्यार्थी आपल्या मेहनतीच्या व अभ्यासाच्या जोरावर दरवर्षी विविध स्पर्धा परीक्षा पोलीस भरती सैन्य भरती मध्ये यशस्वी होत आहेत. व नवीन एनसीसी मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे काम सदरचे विद्यार्थी करतात. सदर निवडीबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे मा. अध्यक्ष व सर्व पदाधिकारी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण मतकर यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले आहे. सदर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम एनसीसी प्रमुख शांता गडगे.शैलजा टिंगरे. शुभांगी पवार यांनी केले.



## टाळ मृदंगाच्या निनादात विवाह सोहळा संपन्न ६० बालवारकरी : २०० महाराज उपस्थित

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**करंजी:** डीजे नाही , डाम दौल नाही मात्र जो आवाज घुमला तो टाळ मृदुंगाचा व ज्ञानोबा माऊली तुकाराम या नाम घोषाचा.धार्मिक व वारंकरी परंपरेनुसार अनिल वाळके महाराज यांच्या मुलीचा विवाह सोहळा नुकताच माळी बाभुळगाव येथे पार पडला. यावेळी अनेक साधुसंत व परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते .माळी बाभुळगाव ता.पाथर्डी येथील वारकरी संप्रदायाचे अखील भारतीय वारकरी संप्रदायाचे प्रदेशाध्यक्ष अनिल महाराज वाळके हे कीर्तनकार, प्रवचनकार व अध्यात्माचा गाढा अभ्यास असलेले म्हणून प्रसिद्ध महाराज आहेत. त्यांची कन्या ज्ञानेश्वरी व पारनेर येथील गोरेगाव चे दतात्रय सुंबे यांचे पुत्र प्रतिक यांचा विवाह सोहळा नुकताच पार पडला.आपण आपली संस्कृती न विसरता व परदेशी संस्कृतीचे आक्रमण रोखुन डीजे सारख्या वाद्याला फाटा देत नवरदेव व नवरीच्या हातात टाळंबदुंग वाजवत लग्न सोहळा पार पडली वारकऱ्यांसह या लग्नात पांढरी टोपी नेहरू व पायजमा असा पेहराव वऱ्हाडी मंडळींनी परिधान केला होता तर आलेल्या १६० बाल वारकऱ्यांनी ही या दंडीत टाळ मृदंग वाजवीत मिरवणूक काढली. यावेळी नवरदेव व नवरी दोघेही टाळ वाजवीत अभंगा म्हणत लग्नाला सामोरे गेले. सुमारे २०० संत महाराज मंडळींनी यावेळी आशीर्वाद देऊन एक वेगळाच पायंडा पाडला. यावेळी हा अविस्मरणीय संस्कार सोहळा तथा लग्न सोहळा पाहण्यासाठी परिसरातील ग्रामस्थांनी गर्दी केली होती. यावेळी बोलताना अनिल महाराज वाळके म्हणाले की आपला धर्म आपली संस्कृती टिकली पाहिजे त्यासाठी आपण प्रत्येकाने डीजे मुक्त वातावरणामध्ये अशा पद्धतीने सर्व कार्यक्रम आयोजित केले पाहिजे अशी अपेक्षा हभप अनिल महाराज वाळके यांनी व्यक्त केली.



## निकालाआधीच इंदिरा गांधी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना नोकरीची संधी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** बेलवंडी शुगर येथील श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे इंदिरा गांधी पॉलिटेक्निक येथे २१ जानेवारी रोजी इपिटॉम प्रा. लि. या कंपनीने नोकरी मेळावा आयोजित केला होता.या मेळाव्यात तृतीय वर्ष मेकॅनिकल इंजिनीअरिंग , इलेक्ट्रॉनिक्स अँड टेले कम्युनिकेशन मधील ५३ विद्यार्थ्यांना निकलापूर्विच कंपनीने नोकरीची संधी उपलब्ध करून दिली. यावेळी कंपनीचे प्रतिनिधी, मॅनेजर,व त्यांच्या सोबत असणारे सर्व प्रतिनिधी यांच्या तीक्ष्ण निवडीतून शेलार आदित्य, साळवे प्रणव,साळवे गणेश, साळवे अजित, साळवे तेजस, शिंदे अभय,रोडे आदित्य, रणपिसे अभिषेक,पवार अभिषेक, उकांडे सार्थक,तांबोळी साद, पठाण जयत, शिंगटे दिप, शिंदे सुयेश, शिंदे ऋषिकेश,इथापे श्रेयस,इथापे ऋषिकेश,होनकरपे प्रतीक, घोगरे यश,जगताप अथर्व, धनवडे श्याम,दळवी वैभव,दगडे शुभम,बांदल गोकुळ, मांडे किशोर,पांडव प्रचेतस, पंधरकर प्रशांत,नलगे विकास,नलगे रोहन,मुंगसे कार्तिक,खान साजरान, कवाद तन्मय,कळमकर ओंकार,राशीनकर संकेत, रोडे संदेश, पंधरकर ज्ञानी, शेळके हर्षदा,सोनवणे प्रसाद,जठार सुमित, बोखरे सौरव, डांगे सार्थक,गायकवाड पायल,जगताप लक्ष्मण,कदम ओंकार,काकडे प्रणव,मांडे सचिन,म्हस्के सार्थक, खेतमाळीस विशाल,कोळपे साक्षी, शिंदे सायली,जठार अरविंद,सातपुते पायल, जगताप आंचल,या विद्यार्थ्यांची थेट मुलाखतीद्वरे निवड केली. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे, व्हॉय. चेअरमन बाबासाहेब भोस, सर्व सन्मानिय संचालक मंडळ, संस्थेचे निरीक्षक सचिनराव लगड, प्राचार्य प्रशांत भोईटे सर,विभाग प्रमुख ,प्रा. हवालदार. ए. आय, प्रा,नातू.एस, प्रा,इथापे. पी.एस, प्रा. शिंदे एम.एन ऑफिसर प्रा. साळवे.एस.एस. व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले



## पाथर्डीत ३०० किलो गोमांस जप्त;दोन वासरांची सुटका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी:**तालुक्यातील तिसगाव येथे तीनशे किलो गोमांस व दोन वासरे पोलिसांनी ताब्यात घेऊन आठ आरोपींविरुद्ध कारवाई करत पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली. ुप्त खबऱ्यामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने पाथर्डी तालुक्यातील तिसगाव येथील रविवार पेठ येथे राहणाऱ्या सद्दाम हारुन शेख याच्या घरी छापा टाकला.त्यावेळी सद्दाम शेख हा त्याच्या घरामध्ये काही इसमांच्या मदतीने गोवंश जनावरांची कत्तल करण्यासाठी निर्दयीपणे डांबुन ठेवले होते.तसेच गोमांस कत्तल करताना काही इसम मिळून आले.सद्दाम हारुन शेख,जावेद हारुन शेख,फरार इरफान फौजमोहमद कुरेशी (रा.रविवार पेठ,तिसगाव),इरफान गफुर शेख,रिजवान मोहमद शेख,असिफ याकुब सय्यद,वसिम मोहमद कुरेशी,आदिल अमिन कुरेशी,(सर्व रा. सदर बाजार,भिंगार) या आठ आरोपींकडून तीनशे किलो गोमांस,दोन वासरे व तीन सुरा जप्त करण्यात आले.आरोपींनी विरोधात महाराष्ट्र पशुसंरक्षण सह प्राण्यांना निर्दयतेने वागविणे व विविध कलमा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात,सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय हिंगडे,बापुसाहेब फोलाणे,सुरेश माळी,विजय ठोंबरे,संदिप दरंदले,मयुर गायकवाड,सागर ससाणे,रोहित मिसाळ,रविंद्र घुंगासे,महादेव भांड या पोलिस पथकाने ही कारवाई केली.

## भारत देशाची लोकशाही जगात भक्कम : प्रा.डॉ.पांढरे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** देशाच्या हितासाठी व विकासासाठी मतदान करणे आवश्यक आहे. मतदार हा राजा आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदारांनी निवडणूकीत मतदानाचा पवित्र हक्क बजावला पाहिजे. आपल्या देशातील लोकशाही संपूर्ण जगात भक्कम व यशस्वी असल्याचे भारत निवडणूक आयोगाने सर्व जगाला दाखवून दिलेले आहे. अशा या भारत निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाल्याने हा दिवस देशभर राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जात आहे, असे प्रतिपादन न्यू लॉ कॉलेज अहमदनगर चे प्रा.डॉ. बी.डी.पांढरे यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू लॉ कॉलेज अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना युथ फॉर माय भारत आणि फॉर डिजिटल लिटरसी या उपक्रमांतर्गत सायबर लॉ व मतदार जनजागृती विषयी मार्गदर्शनपर राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार हिवाळी शिबिर आयोजित शिंगवे नाईक येथील कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत ोते. हे शिबिर न्यू लॉ कॉलेज अहमदनगरचे प्राचार्य प्रा.डॉ.एम.एम.तांबे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी ा.शिरीष हिरडे, कार्यक्रम अधिकारी प्रा.अनुराधा मते यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. तर न्यू लॉ कॉलेज अहमदनगरचे प्रा.अतुल म्हस्के म्हणाले, सायबर गुन्ह्यांचा एक प्राथमिक परिणाम आर्थिक असतो. सायबर गुन्ह्यात अनेक प्रकारच्या नफा-चालित गुन्हेगारी कृतींचा समावेश असू शकतो, ज्यामध्ये रॅन्समवेअर हल्ले, ईमेल आणि इंटरनेट फसवणूक आणि ओळख फसवणूक तसेच आर्थिक खाते, क्रेडिट कार्ड किंवा इतर पेमेंट कार्ड माहिती चोरण्याचा प्रयत्न केला जातो. तर डिजिटल साक्षरता म्हणजे डिजिटल मीडिया प्लॅटफॉर्म वापरून माहिती शोधणे, मूल्यमापन करणे आणि संवाद साधन्याची क्षमता होय. डिजिटल साक्षरता ही एक महत्त्वाची जीवन कौशल्य आहे. इंटरनेट व मोबाईल हे आपल्या जीवनाचे आवश्यक घटक बनले आहेत. आपण दैनंदिन जीवनात याचा वापर माहिती मिळवण्यासाठी, करमणुकीसाठी व आर्थिक व्यवहार करण्यासाठी करतो. हे व्यवहार अधिक सुरक्षित व्हावेत यासाठी आपण सुरक्षित इंटरनेट, तसेच इंटरनेट बँकिंग व ई-मेलचा पासवर्ड वारंवार बदलावा. अनोळखी लिंक वर जाऊन आपली माहीत देऊ नये. सायबर गुन्हा विषयीचा संशय आल्यास माहिती सायबर पोलिसांना कळवावी. यासाठी माहिती व तंत्रज्ञान कायदा,२००० व इतर कायदे आहेत. अशी खबरदारी घेऊन आपण डिजिटल साधनांचा वापर करून आपला वयक्तिक व समाजात बदल घडवू शकतो. असे त्यांनी सांगितले.



# निघोज येथे रमाई आंबेडकर यांची जयंती उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निघोज -** भारतीय बौद्ध महासभा पारनेर शाखा व राहुल नगर मित्रमंडळ पारनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या त्यागमुर्ती माता रमाई आंबेडकर यांचा जयंती उत्सव पारनेर येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पारनेर नगरपंचायतच्या वरिष्ठ अधिकारी आम्रपाली जाधव यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हा कोषाध्यक्ष शुभांगी पवार, केंद्रीय शिक्षीका सरस्वती जावळे, निघोज येथील भैरवनाथ महिला सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन रागिणी बाबाजी वाघमारे, शेख.श. गुप्ता मॅडम, मिरा पुजारी, ड. मोनिका सोनवणे, सुनिता नगरे, ज्योती साळवे, एकता गायकवाड , राहुल नगर महिला मंडळाच्या पदाधिकारी मयुरी जाधव, ज्योती साळवे, करुणा पवार, किर्ती पवार, रुपाली गायकवाड, शारदा नगरे, पुष्पा साळवे, छाया गायकवाड, दर्शना सुर्यवंशी, वर्षा सुर्यवंशी, कामिनी बनसोडे, सुनिता पाडळे, संगिता जाधव, निकिता सातपुते आदि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी भारतीय बौद्ध महासभेच्या केंद्रीय शिक्षीका सरस्वती जावळे यांनी रमाबाईंची महती सांगताना सांगितले की समाजासाठी रमाबाई यांनी काम केले असून सर्वसामान्य समाजाला आधार देण्याचे काम त्यांनी करीत आईची माया देण्याचे काम करीत एक संस्कृतीमय व कष्टकरी समाज कसा होईल यासाठी त्याग मुर्ती माता रमाई यांचे योगदान सर्वाधिक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा उपाध्यक्ष विरेंद्र पवार, तालुका अध्यक्ष बाबाजी वाघमारे, जिल्हा सचिव रेवण साळवे, सचिन नगरे, संपत पवार, भारतीय बौद्ध महासभेचे तालुका सचिव गिरीश गायकवाड, आर पी आय तालुकाध्यक्ष किरण सोनवणे, गोरख सुर्यवंशी, सुनिल शिंदे, विजय सोनवणे, रामकृष्ण पवार, अमित जाधव, सुरेश गायकवाड, सुनिल चौधरी, चंद्रकांत गायकवाड, भागाजी साळवे, जयंत सोनवणे, संपत नगरे, प्रकाश नगरे, रामदास साळवे, हरेश सुर्यवंशी, सिताराम लव्हाडे, मधुकर साळवे, पत्रकार भगवान गायकवाड, प्रल्हाद शिंदे, दादाभाऊ सातपुते, अनिल सातपुते आदी यावेळी उपस्थित होते. महिला भगीनी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी महिला भगीनी यांनी रमाबाई आंबेडकर यांना अभिवादन करीत पुष्पहार अर्पण करण्यात आला. शेख.श. गुप्ता मॅडम , मिरा पुजारी, एकता गायकवाड आदिंची भाषने झाली. शुभांगी पवार यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाचे सुनिता शिंदे, मोनिका सोनवणे, सुनिता नगरे यांनी केले. भैरवनाथ महिला सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन रागिणी बाबाजी वाघमारे व सुनंदा साळवे यांनी आभार मानले.




## मिरीचा दैदिप्यमान इतिहास स्मरणात ठेवावा :वाव्हळ




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**करंजी :**मिरी व मिरी परिसराला दैदिप्यमान इतिहास आहे देशाचे सल्लागार देशाचे कोर्ट आधी इतिहासाच्या पाऊल खुणा या मिरीत आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांनी हा इतिहास स्मरणात ठेवावून अभ्यास केल्यास निश्चितच दैदिप्यमान यश मिळेल असे प्रतिपादन इतिहास संशोधक व अभ्यासक प्राध्यापक डॉ. नवनाथ वावळ यांनी केले.मिरी ता. पाथर्डी येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयात इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता यावेळी बोलत होते. यावेळी साहेबराव गवळी , कारभारी गवळी, सुभाष गवळी, माजी सरपंच संतोष शिंदे, भागीनाथ गवळी, बाबा साहेब निमसे,माजी प्राचार्य एम बी नरवडे ' साहेबराव गवळी आदी उपस्थित होते. यावेळी मिर व पंचक्रोशी चा इतिहास वस्तू वास्तू स्थल काल व्यक्ती इत्यादी पुराव्यांचा दाखला देऊन सांगितला. स्थानिक इतिहासातील प्रेरणा आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या विषयावर बोलताना विद्यार्थ्यांच्या ज्ञानात मौलिक भर टाकण्याचे काम डॉ. नवनाथ वाव्हळ यांनी केले.आपले आदर्श हीरो हीरोइन न ठेवता ज्यांनी कमी वयात इतिहास रचला ते शंभुराजे ज्ञानेश्वर महाराज यांसारख्यांना आदर्श मानावे असे प्रतिपादन प्रा. आर ए देवढे यांनी केले. पर्यवेक्षक युजी कटके, प्रा. एए शिंदे प्रा. ए ए वाघ प्रा एस एन मचे यांनी मार्गदर्शन केले. तर विद्यार्थ्यांत पालवे शिवराज , शेख करिष्मा , शेख समरीन सोलाट श्रद्धा यांनी शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी बोरा हिने तर आभार प्रा. एबी लांडे यांनी मानले.

## जामखेड येथे अग्निशामक केंद्र उभारण्याची मागणी

### तुषार बोथरा यांचे मुख्याधिकारी यांना निवेदन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** तालुक्यातील दुकाने व नागरिकांच्या अग्निसुरक्षेसाठीकोणतीही व्यवस्था नसल्याने एखाद्या ठिकाणी आग लागल्यास तो भस्मसात होईपर्यंत यंत्रणा पोहोचत नसल्याने, जामखेड शहरात अग्निशमन यंत्रणा उभी करावी, अशी मागणी येथील भाजप युवा मोर्चाचे सरचिटणीस तुषार बोथरा यांनी जामखेड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजय साळवे यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे जामखेड शहराचा विस्तार दिवसेंदिवस वाढत चालला असून जामखेड नगरपरिषदेकडे एकच अग्निशामक बंब आहे तालुक्यात इतरत्र कोठेही अग्निशामक व्यवस्था नाही व्यापारी संकुले संभाव्य आगीच्या भडक्यात सापडलीच तर या संकुलांचा कोळसा होईपर्यंत ती आटोक्यात येऊ शकणार नाही, अशी धक्कादायक स्थिती आहे. शहरातील व्यापारी संकुले सर्वाधिक गर्दीची ठिकाणे आहेत. मात्र, सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची आगप्रतिबंधक यंत्रणाही नगरपरिषद व्यवस्थित कार्यान्वित करू शकलेली नाही. त्यामुळे शहराचा वाढता विस्तार लक्षात घेऊन शहरामध्ये स्वतंत्र अग्निशामक केंद्र उभारण्याची गरज असून त्याचबरोबर साधन सामुग्री साठी निधी मंजूर करण्यासाठी शासनाला प्रस्ताव दाखल करण्याची मागणी तुषार बोथरा यांनी केली आहे



दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

रविवार, दि.९ फेब्रुवारी २०२५ | अहिल्यानगर | पान नं. ८

## पंतप्रधान मोदींच्या पत्नी जशोदाबेन यांनी घेतले शनिदर्शन



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पत्नी जशोदाबेन मोदी यांनी काल (शनिवारी) दुपारी शिंगणापूरला येऊन शनिदर्शन घेतले. उदासी महाराज मठात शनि अभिषेक करून शनिमूर्तीवर तेल अभिषेक केला.जनसंपर्क कार्यालयात देवस्थानचे उपकार्यकारी अधिकारी नितीन शेटे व भाजपचे ऋषिकेश शेटे यांनी मोदी यांचा शाल, श्रीफळ व शनि प्रतिमा देऊन सत्कार केला.

उपस्थितांबरोबर सवांद साधतांना त्या म्हणाल्या की, मी १५ वर्षापूर्वी शनीदर्शनासाठी आले होते. त्यावेळेस व आताचे शनीमंदिर यात खूप बदल झाला आहे. गुजरातमध्ये अनेकदा शनीमंदिरात जात असते. आज स्वयंभू शनीमंदिरात दर्शन झाले असताना खूप समाधान वाटते. यावेळी भाजपचे ऋषिकेश शेटे , भीमराज महाले उपस्थित होते. देवस्थानने केलेला महाद्वार, दर्शनपथ पानसतीर्थ प्रकल्प व परिसरातील विकास पाहून आनंद व्यक्त केला. यावेळी शिंगणापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक खगेंद्र टिंभेकर यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# काळानुरूप होणारे बदल स्वीकारावेत : ना. विखे

## शेतकऱ्यांसाठी डाळिंब बहार मेळावा व कृषी प्रदर्शनाचे उद्‌घाटन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर :** कृषी व्यवस्थेत काळानुरूप होणारे बदल स्वीकारल्याशिवाय आता पर्याय नाही. आधुनिक तंत्रज्ञान आणि जैविक खतांचा योग्य उपयोग करुन, उत्पादन क्षमता वाढविण्याचे आव्हान यापुढे स्वीकारावे लागणार आहे. सेंद्रीय शेतीकरिता केंद्र आणि राज्य सरकारचे धोरण हे उपयुक्त ठरणार असून, निर्यातक्षम उत्पादन निर्माण करण्यासाठी आता कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांनीसुध्दा मार्गदर्शन करण्याची भूमिका एकत्रितपणे बजावावी, असे आवाहन जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी केले.





डाळींबरत्न बाबासाहेब गोरे यांच्या पुढाकाराने अहिल्यानगर, पुणे, नाशिक जिल्ह्यातील डाळींब उत्पादक शेतकऱ्यांसाठी आयोजित केलेल्या डाळींब बहार मेळावा तसेच कृषी प्रदर्शनाचे उदघाटन ना. विखे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. महंत उध्दव महाराज मंडलिक, जिल्हा अधीक्षक कृषी आधिकारी सुधाकर बोराळे, बाजार समितीचे उपसभापती आण्णासाहेब कडू, महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यापीठाचे सदस्य ऋषिकेश खांदे, तालुका कृषी आधिकारी आबासाहेब भोरे, सतीश बावके, संदिप निर्मळ, सचिन चिंधे, हर्षल खांदे यांच्यासह डाळींब उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

ना. विखे म्हणाले की, कृषीक्षेत्रामध्ये नैसर्गिक आणि मानवनिर्मित आव्हानं निर्माण होत असले तरी, यावर मात करुन, तरुण शेतकरी प्रयोगशील शेती निर्माण करीत आहेत. या शेतकऱ्यांना बाबासाहेब गोरे यांच्याकडून मिळणारे मार्गदर्शन हे उपयुक्त ठरत असून, जे कृषी विद्यापीठांना जमले नाही ते गोरे यांनी आपल्या संशोधन संस्थेतून करुन दाखविले. त्यांच्या नवनवीन संकल्पनांमुळे डाळींबासह सोयाबीनचे उत्पादनही वाढले वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

देशाच्या आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचा वाटा महत्वपूर्ण असल्याने केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगून ना. विखे म्हणाले की, नुकत्याच सादर झालेल्या अर्थसंकल्पातही कृषीक्षेत्रासाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत. केंद्र सरकारने नेहमीच प्रक्रीया उद्योग आणि कृषी क्षेत्रातील स्टार्टअपला प्रोत्साहन दिले असून कृषीक्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करतानाच सेंद्रीय शेतीलाही आपल्याला पुढे घेऊन जावे लागेल. जैविक खतांच्या मात्रांमुळेच आज उत्पादनाची क्षमता वाढत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. निसर्गाचे आव्हान आपल्या समोर आहेच. यासाठी राज्य सरकारने हवामानावर आधारित पीकविमा योजना फळांसाठीसुध्दा लागू केली असून, याचा मोठा लाभ डाळींब उत्पादक शेतकऱ्यांनाही झाला असून, राज्य सरकार कोणतीही योजना बंद करणार नाही, लाडक्या बहिणीं प्रमाणेच तुम्हालाही विमा योजनेचा लाभ देण्यासाठी राज्य सरकार कटीबध्द असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी मंडलिक महाराज, बाबासाहेब गोरे यांचीही भाषणे झाले. मंत्री विखे यांच्यासह मान्यवरांनी प्रदर्शनामध्ये मांडण्यात आलेल्या कृषी औजारे आणि साहित्यांच्या स्टॉलला भेट दिली.

## १४ वर्षीय धिनिधी देसिंघूची ९ सुवर्णांसह ११ पदकांची विक्रमी कामगिरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**उत्तराखंड :** गोलापूर येथील मानसखंड तरांतल येथे ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत देसिंघूने ५७.३८ सेकंदाच्या विक्रमी वेळेसह महिलांची १०० मीटर फ्री स्टाईल स्पर्धा जिंकली. यापूर्वी गोव्यातील राष्ट्रीय स्पर्धेमध्ये तिने ५७.८७ सेकंद या वेळेत १०० मीटर फ्रीस्टाइल स्पर्धा जिंकली होती. धिनिधी देसिंघूने नंतर नायशा शेट्टी, विदित शंकर आणि सहकारी ऑलिम्पियन श्रीहरी नटराज यांच्यासोबत संघ करून कर्नाटकला ४ मिनिटे आणि ३.९१ सेकंदांच्या वेळेसह मिश्र ४ बाय १०० मीटर मेडले जिंकण्यात मदत केली. देशसिंघूचे हे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील ९ वे सुवर्ण ठरले. देसिंघूने पूलमधील तिची वर्चस्व मोहीम सुरू ठेवण्यासाठी महिलांच्या ४०० मीटर फ्रीस्टाइल जलतरण स्पर्धेत नवीन राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केला.





१४ वर्षांच्या या मुलीने ४:२४.६० अशी वेळ नोंदवली आणि गतवर्षी वरिष्ठ नागरिकांमध्ये हशिका रामचंद्रने स्थापित केलेला ४:२४.७० चा राष्ट्रीय जलतरण विक्रम मोडीत काढला. तिने यापूर्वी दिल्लीच्या भव्य सचदेवाने ४:२७.९३ च्या रचलेला रेकॉर्डदेखील मोडला. त्यानंतर देसिंघूने श्रीहरी नटराज, आकाश मणी आणि नीना व्यंकटेश यांच्यासोबत मिश्र ४ बाय १०० मीटर फ्रीस्टाइल रिलेमध्ये ३:४१.०३ वेळ घेत सुवर्णपदक पटकावले.तिने एका दिवसात तीन सुवर्ण जिंकले – २०० मीटर फ्रीस्टाईल (२:०३.२४), १०० मीटर बटरफ्लाय (१:०३.६२), आणि महिला ४ बाय १०० मीटर फ्रीस्टाईल रिले (४:०१.५८). तिने २०० मीटर फ्रीस्टाइलमध्ये स्वतःचा राष्ट्रीय विक्रमही पुन्हा मोडला. ४ बाय १०० मीटर फ्रीस्टाईल रिले संघात नीना व्यंकटेश, शालिनी आर दीक्षित आणि लतीशा मंदाना यांचा समावेश होता. शिरीन, शालिनी दीक्षित आणि मीनाक्षी मेनन यांच्यासमवेत ५० मीटर फ्रीस्टाईल (२६.९६) आणि महिलांच्या ४ बाय २०० मीटर फ्रीस्टाईल रिले (८:५४.८७) मध्ये देसिंघूची सुवर्ण कामगिरी सुरूच राहिली. तिने ५० मीटर बटरफ्लायमध्ये रौप्य आणि ४ बाय १०० मीटर मेडले रिलेमध्ये कांस्यपदक मिळवले.

## वीजजोड कट करणाऱ्या वायरमनला दगडाने मारहाण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील ब्राह्मणगाव भांड गावातील काळे – भांड वस्तीवर वीज बिल भरले नाही म्हणून वीज कनेक्शन कट करणाऱ्या महावितरणच्या वायरमनला दगडाने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे.या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ब्राम्हणगाव भांड येथील रघुनाथ जगन्नाथ भांड यांनी विज बिल दिले नाही म्हणून त्यांच्या नावे असलेले विजेचे कनेक्शन कट करण्यासाठी वायरमन हरिभाऊ भाऊसाहेब येळे हे शुक्रवारी सायंकाळी विजेच्या पोल वर चढत असताना विजेचे कनेक्शन कट करू नये म्हणून रघुनाथ जगन्नाथ भांड यांनी वायरमन यांना दगड फेकून मारले व वायरमन खाली उतरल्यानंतर त्यांच्यासोबत असलेले कर्मचारी निलेश इंगळे यांना शिवीगाळ करून धक्काबुक्की केली . परत या रस्त्याने दिसले तर तुमचे हातपाय मोडून टाकून जीवे मारून टाकीन अशी धमकी दिली. याबाबत राहुरी पोलीस ठाण्यात हरिभाऊ भाऊसाहेब येळे यांच्या फिर्यादीवरू रघुनाथ जगन्नाथ भांड (राहणार ब्राह्मणगाव भांड) याच्या विरोधात सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा राहुरी पोलिसात दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस करत आहेत.

# गावठी बंदुकीवर पोलिसांचे धाडसत्र

## तीन कट्ट्यासह पाचजणांवर गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** येथील दहशत मोडून काढण्यासाठी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने काल केलेल्या धाडसत्रामध्ये तीन गावठी पिस्टलसह सुमारे अडीच लाखाचा मुद्दे माल जप्त केला असून तीन आरोपीना अटक केली असून कट्टे विक्री करणारे दोन आरोपी फरार आहेत .

शिर्डी येथील गणेश आप्पासाहेब शेजवळ, रा. शिर्डी, ता. राहाता याचेकडे अग्नीशस्त्र असून त्याने दहशत निर्माण करण्याकरीता फायर केला असून, त्याने फायर केल्याचा व्हिडीओ त्याचे मोबाईलमध्ये असल्याची माहिती गुप्त खबऱ्यामार्फत मिळाली असता पोनि आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोसई तुषार धाकराव, व पोलीस अंमलदार गणेश भिंगारदिवे, बाळासाहेब नागरगोजे यांचे पथकाने पंचासमक्ष अजय रत्नाकर शेजवळ रा. शिर्डी ता. राहाता याचे घरातुन १,५०,००० रू किंमत असलेले ३ गावठी पिस्टल, ३ जिवंत काडतुसे व ३ रिकाम्या काडतुसाच्या पुंगळया जप्त केल्या आहेत. ताब्यातील आरोपी गणेश आप्पासाहेब शेजवळ व अजय रत्नाकर शेजवळ यांचे कब्जातुन १,२०,००० रू किंमतीचे दोन मोबाईल जप्त करण्यात आलेले आहेत.ताब्यातील आरोपी गणेश आप्पासाहेब शेजवळ याचेकडे मिळून आलेल्या गावठी पिस्टल व काडतुसाबाबत विचारपूस केली असता त्याने निमगाव को. येथील भाऊसाहेब साहेबराव जगताप ४) राकेश पगारे (पुर्ण नांव पत्ता माहित ) ५) रोशन सोमनाथ कोते रा. शिर्डी, ता. राहाता यांचेकडून प्रत्येकी १ पिस्टल व दोन जिवंत काडतुसे खरेदी करून, त्यापैकी ३ काडतुसे हवेत फायर केले असल्याचे सांगीतले.पिस्टल विक्री करणाऱ्या इसमांचा शोध घेतला असता त्यातील रोशन सोमनाथ कोते, वय २४, रा.शिर्डी, ता. राहाता हा मिळून आलेला असून उर्वरीत फरार आरोपींचा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकामार्फत शोध घेण्यात येत आहे. सदर आरोपीविरूध्द शिर्डी पोलीस ठाणे गु.र.नं. ११६/२०२४ आर्म क्ट कायदा कलम ३/२५, ७, २७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्हयांचा पुढील तपास शिर्डी पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक रणजित गलांडे हे करीत आहेत.



# अल्पवयीन मुलास पळवून नेणाऱ्या महिलेला अटक

## तीन दिवसाची पोलिस कोठडी, मुलाला चोरी करण्यास करत होती जबरदस्ती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** तालुक्यातील देवळाली प्रवरा येथून एका अल्पवयीन मुलाचे अपहरण झाले असल्याची तक्रार मुलाच्या आईने राहुरी पोलिसात दिली २३ जानेवारीला दिली होती. त्यावरून राहुरी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी तातडीने पावले उचलून त्या अल्पवयीन अपहरण झालेल्या मुलाचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक नेमले. त्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक धर्मराज पाटील यांना गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीवरून आरोपी रेखा शरद पवार या महिलेस ताब्यात घेऊन तिला पोलीस खाक्या दाखविल्यानंतर तिने राहुरी पोलीस स्टेशन हद्दीसह अहिल्यानगर जिल्ह्यात मोटरसायकल चोऱ्या व इतर चोऱ्या केल्याची कबुली दिली. तिला अटक करण्यात आली. मोटरसायकल व इतर चोऱ्या करण्यासाठी अल्पवयीन मुलांचा वापर करीत असल्याचे सांगून, देवळाली येथून अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलास चोऱ्या करायला लावत असल्याचे तिने सांगितले. पीडित अल्पवयीन मुलाची सुटका करून त्याची चौकशी केली असता प्रथम तो काही सांगत नव्हता. परंतु पोलिसांनी त्यास विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्याने सदर महिलेच्या सांगण्यावरून चोऱ्या करत असल्याची माहिती दिली. चोऱ्या न केल्यास अल्पवयीन मुलास मारहाण करून उपाशीपोटी ठेवत होती. नातेवाईकाला सापडणार नाही या उद्देशाने अज्ञातस्थळी डांबून ठेवल्याचे अल्पवयीन मुलाने सांगितले. तसेच तिच्याविषयी कोणी काही तक्रार केल्यास ती त्यांच्यावर खोटेनाटे आरोप करून पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्याची धमकी देत होती. अल्पवयीन पीडित मुलास त्याचे आई-वडिलांच्या ताब्यात देऊन त्या महिलेवर लावलेल्या गुन्ह्यात वाढ करण्यात आली.



मुख्य आरोपी रेखा शरद पवार (राहणार राहुरी फॅक्टरी, तालुका राहुरी) हिला सदर गुन्ह्यात वर्ग करून घेऊन राहुरी न्यायालयात हजर केले असता राहुरी न्यायालयाने १० फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. याकामी सहाय्यक सरकारी अभियोक्ता रवींद्र गागरे यांनी काम पाहिले. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक धर्मराज पाटील, पोकॉ. गणेश लिपणे, महिला पोहेकॉ. स्वाती कोळेकर, महिला पोकॉ. मीना नाचन हे करत आहेत. अल्पवयीन मुला-मुलींना पळून आणून त्यांच्याकडून चोऱ्या किंवा इतर काही कृत्य करून घेत असल्याची माहिती किंवा कुणाच्या नजरेत असला प्रकार आल्यास तातडीने राहुरी पोलीस स्टेशनला संपर्क करावा. असे आवाहन ठेंगे यांनी केले आहे.

## उद्धवसेनेचे १० नगरसेवक शिंदे सेनेत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**छत्रपती संभाजीनगर :** उद्धव सेनेचे तीन वेळा महापौर राहिलेले पती-पत्नी नंदकुमार घोडेले, अनिता घोडेले यांनी शिंदे सेनेत प्रवेश केल्यानंतर उद्धव सेनेत कमालीची अस्वस्थता निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर चंद्रकांत खैरे आणि अंबादास दानवे यांनी पदाधिकारी आणि नगरसेवकांच्या घरोघरी जाऊन त्यांचे मनोधैर्य वाढविण्याचा प्रयत्न केला. मात्र आठवडा होत नाही तोच नाही नाही म्हणत आणखी दहा नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबईत शिंदे प्रवेश केला. अगदी जवळची माणसे पक्ष सोडून जात असताना आधीच अस्वस्थ असलेल्या चंद्रकांत खैरे यांचा तीळ पापड पापड झाला आहे.



आमदार प्रदीप जैस्वाल यांच्या नेतृत्वाखाली या १० नगरसेवकांनी शिंदे सेनेत प्रवेश केला. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट तसेच राजेंद्र जंजाळ अनुपस्थित होते, त्यामुळे शिंदे सेनेत छत्रपती संभाजीनगरात दरी निर्माण झाली की काय, अशी चर्चा होत आहे. दरम्यान ९ जानेवारी रोजी उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीवर या सर्वांची बैठक घेतली होती. पक्षाची ताकद वाढविण्यासाठी आणि पक्ष एकसंघ राहण्यासाठी या सर्वांनी त्यावेळी वचन दिले होते. मात्र या सर्वांनी शिंदे सेनेत प्रवेश केला आहे. प्रवेश केलेला नगरसेवकांमध्ये मोहन मेघावाले, मकरंद कुलकर्णी, अनिल जयस्वाल, ज्योती पिंजरकर, किशोर नागरे, स्वाती नागरे, रूपचंद वाघमारे,ज्योती वाघमारे, मीनाताई गायके,सीमा खरात यांचा समावेश आहे.

जे दहा नगरसेवक शिंदेशात गेले आहेत त्यांनी बदमाशी केली असून या लोकांना स्थायी समितीचे पदे दिली. सर्व काही दिले. मात्र या लोकांनी शिवसेनेशी गद्दारी केली आहे. आता यांना पाडून नवीन लोकांना निवडून आणणार आहोत. त्याची सुरुवात आम्ही केली आहे. या लोकांसोबत उद्धव ठाकरेंची बैठक झाली होती. मात्र त्यांनी मोठी चूक केली आहे. **- चंद्रकांत खैरे**

# मुंबईचा उमेश गुप्ता झाला 'महाराष्ट्र श्री' ; हरमीत सिंगवर केली मात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** मूर्ती छोटी, पण किर्ती महान. अवघ्या सव्वा पाच फूट उंचीच्या मुंबई उपनगरच्या उमेश गुप्ताने गतविजेत्या हरमीत सिंग आणि कमलेश अच्चरा या आपल्यापेक्षा वजनदार असलेल्या शरीरसौष्ठवपटूंवर मात करत प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र श्रीवर आपल्या नावाची मोहोर उमटवली. महिलांच्या शरीर सौष्ठव स्पर्धेत मुंबई उपनगरच्याच रेखा शिंदेने बाजी मारली. गेल्यावर्षीही तिनेच मिस महाराष्ट्रचा मान मिळवला होता. पुरुषांच्या फिजीक स्पोर्ट्स प्रकारात पुण्याच्या नरेंद्र व्हाळेकर आणि शुभम पवार यांनी अव्वल स्थान पटकावले. चार गटात सुवर्णपदक पटकावणाऱ्या मुंबई उपनगरच्या खेळाडूंनी सांघिक विजेतेपदाचाही मानही संपादला.

पुण्यातील थेऊर येथील श्री चिंतामणी मंदिराच्या प्रांगणात झालेल्या महाराष्ट्र श्री शरीरसौष्ठव स्पर्धेत गणेश आणि क्रीडाभक्तांना पीळदार थराराचा अनुभव घेता आला. चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्ससाठी स्टेजवर नऊही गटविजेते उतरले तेव्हा सर्वांचा नजरा कमलेश अच्चरा आणि हरमीत सिंगकडे वळल्या होत्या. या दोघांपुढे उंचीने कमी असलेला उमेश गुप्ता पीळदार वाटत होता. त्याची उंची, त्याच्या स्नायूंचे आकारमान निश्चित कमी होते, पण त्याच्या आखीवरेखीवपणा आणि पीळदारपणाने त्याला महाराष्ट्राच्या शरीरसौष्ठवाचे ऑस्कर जिंकून दिले.



**स्पर्धेचा निकाल**

किताब विजेता: उमेश गुप्ता (मुंबई उपनगर)
उपविजेता: कमलेश अच्चरा (पुणे)
प्रगतिकारक शरीरसौष्ठवपटू :उद्देश ठाकूर (रायगड)
उत्कृष्ट पोजर: हरमित सिंग (मुंबई उपनगर)
सांघिक विजेतेपद: मुंबई उपनगर ( २४८ गुण )
उपसांघिक विजेतेपद: पुणे (१७३)

विशेष म्हणजे गेल्यावर्षी झालेल्या महाराष्ट्र श्री स्पर्धेत त्याला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. मात्र यंदा त्याने आपले गेले अपयश धुवून काढताना महाराष्ट्र श्रीचा मान पटकावला. महाराष्ट्रातील शरीरसौष्ठवपटूंसाठी सर्वात प्रतिष्ठेच्या या स्पर्धेत १६० पुरुष शरीरसौष्ठवपटूंसह फिजीक स्पोर्ट्सचे ५५ स्पर्धक आणि महिलांच्या गटातील १२ पीळदार सौंदर्यवती असे एकंदर २२७ स्पर्धकांनी मंचावर उतरून महाराष्ट्राची ताकद दाखवली.या दिमाखदार स्पर्धेत विजेत्यांवर तब्बल दहा लाखांच्या रोख पुरस्कारांचा वर्षाव करण्यात आला. पुरस्कार सोहळा आयोजक नवनाथ काकडे, आमदार राहुल कूल, आमदार ज्ञानेश्वर कटके, आमदार बापूसाहेब पठारे, आयबीबीएफचे व एबीबीएफचे सरचिटणीस डॉ.संजय मोरे, महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशनचे सरचिटणीस अजय खानविलकर, खजिनदार सुनील शेगडे, राजेश सावंत, राजेंद्र सातपूरकर, नरेंद्र कदम यांच्या उपस्थितीत पार पडला.